# स्वकुळ समाचार

वर्ष - ७ अंक -०९ ठाणे सप्टेंबर २०२१ पाने - ४९ वार्षिक वर्गणी रु. ३००/-




ठाणे जिल्हा स्वकुळ
१९८२
साळी समाज

अखिल भारत स्वकुळ साळी समाज मान्यताप्राप्त
अखिल महाराष्ट्र स्वकुळ साळी समाज मान्यताप्राप्त
ठाणे जिल्हा स्वकुळ साळी समाज संचालित
नोंदणी क्र. ई/९२८/ठाणें दि. १७/५/८८

# स्वकुळ समाचार

RNI No. MAHMAR/2014/57230

- ❖ नविन सभासद २००० रुपये (१५ वर्षाकरिता)
  १५०० रुपये (१० वर्षाकरिता)
  १००० रुपये (५ वर्षाकरिता)
- ❖ उपवरवधू नोंदणी (प्रत्येक अंकासाठी) रु. ७५/- व फोटोसह रु. १५०/-
- ❖ उपवरवधू नोंदणी सलग वर्षभर रु. ७५०/- व फोटोसह रु. १५००/-
- ❖ विश्वस्तनिधी १५०१/- रु. ❖ आधारस्तंभ १५०१/- रु. ❖ पृष्ठदान १५००१/- रु.
- ❖ मंगलनिधी ५०१/- रु.

स्वकुळ समाचार या नावाने डोंबिवली नागरी सहकारी बँक मधील आमच्या खात्यावर पैसे भरलेल्या पावतीसह आपल्या सर्व प्रकारचे लिखित साहित्य किंवा मजकूर आपण ई मेलवरही पाठवू शकता

You can transfer your Amount to SWAKUL-SAMACHAR from any bank
Favouring : Swakul Samachar
Bank Name : Dombivli Nagari Sahakari Bank.
Branch : Nandivli
IFCS CODE : DNSB0000009
Saving A/c No. 009010100002199

E-mail: sampadakswakulsamachar@gmail.com
Website: www.swakulsamachar.com

**कार्यालय:** फ्लॅट नं. ०१, साईसेवा नं. २ को. ऑप. हौ. सोसा., जन. अरुण कुमार वैद्य चौक, गांधीनगर, मानपाडा रोड, डोंबिवली (पूर्व) जि. ठाणे ४२१२०१

**अध्यक्षः श्री. विनोद वसंतराव सजगुले**
रुम नं. १४७, साई नगरी समोर, मीठबंदर रोड,
डॉ. कोळी क्लिनीकच्या बाजूला, चेंदणी कोळीवाडा, ठाणे (पूर्व)
पिन-४००६०३ मोबा.: ९८९२३९३३७१/०२२-२५३२८९६३
**सचिवः** श्री. राजेश शंकरराव साळी, ९९६७५८४०३२
**सहसचिवः** सौ. शैलजा सोमनाथ कासटकर, ९८२०१४५४५१
**उपाध्यक्षः** श्री. प्रकाश वासुदेव पावले, ८८०६९८७५६४
**कोषाध्यक्षः** श्री. ईश्वरलाल एकनाथ फंड, ८६५२२१५१६३
**अंतर्गत हिशोब तपासणीसः** बारसु सिताफळे, ९३२६१८२४३५
**आर्थिक सल्लागारः** श्री. नितीन ढवण(सीए) ९८२२४५६७६६

**सल्लागारः** श्री. भालचंद्र नेमिचंद साळी, ९७०२६४४२३२
श्री. सोमनाथ रतिलाल कासटकर, ९८२०८२१७२६
डॉ. किसनराव जगन्नाथ जेधे, ९८३३८२०६०१
श्री. बाळकृष्ण ओंकार आढाव, ९७५७०८६९१५

**संपादक : श्री. गोपाळ सुकलाल थोरात**
घरकुल हौ. सोसा., रुम नं.५१७७, मारुती मंदिराजवळ,
शिवाजी नगर, अंबरनाथ (पूर्व) ४२१५०१ मो.: ७७०९३१५४९८
**सहसंपादक :** श्री. अविनाश शंकर धोत्रे, ९५०३३१२५६६
**सहसंपादकः** श्री. रमेश विष्णुदास बारगजे, ९८६९४८३६००
**संपादक मंडळः** श्री. पुरुषोत्तम जगन्नाथ साळी,८४२१९१०४३७
श्री. शशिकांत डहाके, ९८९२०२३७६३

**तांत्रिक समितीः श्री. उदयकुमार साळी,९३२३३८६१३९**
(DCE, B.Tech, Civil)
**तांत्रिक सल्लागार, सामान्य प्रशासन, ठाणे जिल्हा**
**वेब डिझायनरः श्री. बाळकृष्ण साळी, सुरत ९०३३६०३६१३**
**सदस्यः** श्री. राजेश जगन्नाथ साळी, ९२०९२०३६९६
श्री. पंकज अरुण दिवटे, ९८२०८८२२८९

**कायदेशीर सल्लागारः** ॲड. श्री. गजानन सदाशिव घटे
बी.कॉम.,एल.एल.बी.,जी.डी.सी. ॲण्ड ए
मो.: ९८३३५२७१२२

## अधिकृत प्रतिनिधी

१)श्री. संजय सुरेश खोपे, खोपोली९५६१८१९१९३
२)श्री. अशोक शिवदास साळी,सुरत९९०९६०१९७०
३)श्री. प्रविण जी. ढवण, विंचूर ९८८१५८२७२९
४)श्री. पंडित माधवराव साळी, एरंडोल ९४२३३४३८३०
५)श्री. बाळकृष्ण मारूतीराव डमरे, बडोदा ९४२६०२५११४
६)श्री. विजय गोविंद वैद्य, चिपळूण९०२१५६४०२८
७)श्री. चंद्रकांत आत्माराम हावरे, नाहूर ८७७९१७२९८६

**नविन अधिकृत प्रतिनिधींच्या नियुक्ती साठी अर्ज मागविण्यात येत आहे.** - १) प्रतिनिधीचे वय २१ ते ७० या दरम्यान असावे. स्थानिक संस्थेचे सभासद असावेत. २) स्वकुळ समाचारसाठी जास्त वेळ देणारे तसेच नविन सभासद, जाहिरात, देणगी, इमारतनिधी आणि आपल्या विभागातील कार्यक्रमाचे वृतांन्त तातकाळ देणारे असावेत. ३) संस्थेबद्दल आस्था असणारे सुशिक्षित व संस्थेसाठी तन,मन,धन अर्पण करणारे असावेत.

**जाहिरातीचे दर**

| | | |
|---|---|---|
| रंगीत पूर्ण पान रु. ४५००/- | साधे पूर्ण पान रु. १२००/- | साधे पावपान रु. ३००/- |
| रंगीत अर्धेपान रु. २५००/- | साधे अर्धेपान रु. ६००/- | शुभेच्छा रु. २५१/- |

बातमी मधील एक कृष्ण धवल पासपोर्ट साईज फोटो करीता रु. १००/- (फोटोची ईमेज चांगली हवी)

# स्वकुळ समाचार पत्रिका
# अत्यंत महत्वाचे निवेदन तथा आवाहन

सप्रेम जय जिव्हेश्वर,

आपणांस ज्ञात आहेच की, आपल्या समाजातील धुरीणांनी ठाणे जिल्हयातील साळी समाजबांधवाच्या सर्वांगीण प्रगतीसाठी आणि सुविधेसाठी सन 1987 पासुन ' स्वकुळ समाचार' पत्रिकेची निर्मिती केलेली आहे.

तेव्हापासुन आजतगायत हा यज्ञ अव्याहतपणे सुरु आहे. अत्यंत माफक दरात लोकप्रिय 'स्वकुळ समाचार' चा अंक बृहनमहाराष्ट्रात गावागावात पोचवला जात आहे व त्यास उत्तम प्रतिसाद लाभत आहे.

परंतु सध्याच्या महागाईच्या काळात सर्व प्रकारच्या सेवांचे दर वाढल्याने पुर्वीच्याच किंमतीत अंकाच्या दर्जात तडजोड न करत अंक प्रकाशित करणे संपादक मंडळास दिवसेंदिवस जिकरीचे होत चाललेले आहे. किंबहुना हा आतबट्ट्याचा व्यवहार ठरत असुन संस्थेची आर्थिक स्थिती सातत्याने खालावत जात आहे.

तथापि केवळ समाजोन्नतीचे उद्दीष्ट नजरेसमोर ठेऊन अंक नियमितपणे प्रकाशित करत आहोत. परंतु आता अंक चालु राहण्याच्या दृष्टीने याबाबत काही कठोर निर्णय घेणे क्रमप्राप्त आहे. आपण संस्थेची अडचण समजुन घ्याल अशी आशा आहे.

सबब या सर्व बाबींचा सर्वसमावेशक उहापोह करुन संपादक मंडळाने 'स्वकुळ समाचार'चे जानेवारी 2022 पासुन सुधारीत दर व इतर तदनुषंगिक शुल्काचे व प्रसिध्दी बाबतचे धोरण निश्चित केलेले आहे. ते सोबत देत आहोत.

तरी आपणा सर्वांकडुन याबाबतीत नेहमीप्रमाणे 'स्वकुळ समाचार' हीतार्थ सहकार्य अपेक्षीत आहे.

धन्यवाद! (कृ.मा.प.)

1 स्वकुळ समाचार' अंकाच्या प्रसिध्दीबाबत सखोल अभ्यास केला असता सद्य:स्थितीत ' स्वकुळ समाचार' या अंक मासिक ऐवजी व्दैमासिक करणे अधिक संयुक्तीक व व्यवहार्य ठरेल असा सर्वाणुमते निष्कर्ष काढण्यात आलेला आहे व त्यानुसार अंकाचे सुधारीत दर निश्चित करण्यात आलेले आहेत. ते खालीलप्रमाणे असतील याची कृपया नोंद घ्यावी.

अ)वार्षिक वर्गणी देणगी मुल्य:रु.500/- (एकुण 05 अंक व 01 दिपावली विशेषांक)

ब)पंचवार्षिक देणगी मुल्य:रु.1500/- (एकुण 25 अंक व 05 दिपावली विशेषांक)

क)दशवार्षिक देणगी मुल्य:रु.1500/- (एकुण 50 अंक व 10 दिपावली विशेषांक)

ड)15 वर्षासाठी देणगी मुल्य:रु.5000/- (एकुण 75 अंक व 15 दिपावली विशेषांक)'

2 स्वकुळ समाचार' व्दैमासिकातील विविध प्रकारच्या जाहीराती शुभेच्या इ. चे सुधारीत दर खालीलप्रमाणे असतील याची कृपया नोंद घ्यावी.

अ)रंगीत मुखपृष्ठ पुर्ण पान:रु.5000/-

ब)रंगीत अर्धे पान :- रु.3000/-:रु.3000/-

क)साधे पुर्ण पान :- रु.1500/-:रु.1500/-

ड)साधे अर्धे पान :- रु.1000/-:रु.1000/-

इ)साधे पाव पान:रु.500/-

फ)शुभेच्छा:रु.300/-

'स्वकुळ समाचार' व्दैमासिकातील उपवर व उपवधु नोंदणी संबंधीच्या सुधारीत शुल्काचा तपशील खालीलप्रमाणे असेल याची कृपया नोंद घ्यावी.

अ)उपवर/वधु नोंदणी प्रत्येक अंकासाठी:रु.75/- (फोटोसह रु.150/-)

ब)उपवर/वधु वार्षिक नोंदणी:रु.750/- (फोटोसह रु.1500/-)

'स्वकुळ समाचार' व्दैमासिकासंबंधी इतर बाबींविषयक सुधारीत शुल्क खालीलप्रमाणे असेल याची कृपया नोंद घ्यावी.

अ)विश्वस्त निधी:रु.2000/-

ब)आधार स्तंभ निधी:रु.2000/-

क)पृष्ठदान निधी:रु.20,000/-

ड)मंगल निधी :.:रु.1000/-'

स्वकुळ समाचार'च्या मुद्रीत अंकाव्यतिरिक्त हा अंक Online पध्दतीने PDF स्वरुपात ही प्रकाशित करण्यात येईल व संस्थेकडे नोंद असलेल्या ठराविक समाजबांधवांच्या What's App वर तो विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात येईल. तथापि, असा Online अनु मुद्रित अंकाइतका परीणामकारक ठरत नसल्याने शक्यतो स्वकुळ समाचार चे सर्वसाधारण वर्गणीवार होणे उचित ठरेल. याची कृपया नोंद घ्यावी.

**स्वकुळ समाचार'च्या विद्यमान सदस्यांसाठी सदर नोव्हेंबर 2021 चा अंक हा शेवटचा अंक असेल व यापुढे सुधारीत वर्गणी भरुन सभासद झालेल्या समाज बांधवाना जानेवारी 2022 पासुन अंक पाठवण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.**

तरी आपणांसर्वांना विनम्र आवाहन करण्यात येत आहे की, कृपया नवीन सुधारीत वर्गणी लवकरात लवकर भरुन 'स्वकुळ समाचार'चे सभासद व्हावे व संपादक मंडळ तसेच ठाणे जिल्हा कार्यकारीणीस सहकार्य करावे.

धन्यवाद!

**आपले कृपाभिलाषी**

**'स्वकुळ समाचार'संपादक मंडळ** ठाणे जिल्हा स्वकुळ साळी समाज कार्यकारिणी

**अधिक माहितीसाठी संपर्क व्यक्ती**

| श्री.गोपाळ थोरात | श्री.राजेश साळी | श्री.ईश्वर फंड |
|---|---|---|
| संपादक 'स्वकुळ समाचार | 'सचिव. ठाणे जिल्हा | कोषाध्यक्ष. ठाणे जिल्हा |
| 7709315498 | 9967584032 | 8652215163 |

# ठाणे जिल्हा स्वकुळ साळी समाज आणि डोंबिवली स्वकुळ साळी हितवर्धक संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने भगवान श्री जिव्हेश्वर जन्मोत्सव








ठाणे जिल्हा स्वकुळ साळी समाज आणि डोंबिवली स्वकुळ साळी हितवर्धक संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने शुक्रवार, दिनांक 20 ऑगस्ट 2021 म्हणजेच श्रावण शुद्ध त्रयोदशी या दिवशी भगवान श्री जिव्हेश्वर जन्मोत्सव मोठ्या उत्साहात ठाणे जिल्हा स्वकुळ साळी समाजाच्या डोंबिवली येथील कार्यालयात सर्व सरकारी नियम , अधिनियम पाळून, पदाधिकारी व समाज बांधव यांच्या उपस्थितीत साजरा करण्यात आला. आदल्या दिवशी संपूर्ण कार्यालय झाडून स्वच्छ करून व गोमूत्र शिंपडून शूचिर्भूत करण्यात आले. पाळणा सजवण्यात आला आणि भगवान श्री जिव्हेश्वराची प्रतिमा टेबलावर सजवून ठेवण्यात आली. सकाळी घाई होऊ नये म्हणून सर्व पूर्वतयारी करून ठेवली. पहाटे साडेपाच वाजता


















सर्वजण नटून-थटून हजर झाले. सर्वप्रथम महिलांनी सौ मंजूषा मंद्रे,सौ विजया एडके, सौ सुनीता साळी यांनी जिव्हेश्वर जन्मोध्याय वाचला, श्री राजेश साळी व श्री पंकज साळी हे प्रतिमेस हार व पाळण्याला हार फुले लावण्यात मग्न होते. ठीक सहा वाजून वीस मिनिटांनी भगवान श्री जिव्हेश्वर यांना पाळण्यात घालण्यात आले. महिलांनी पाळणा व सर्वांनी आरत्या म्हटल्या., श्री भालचंद्र साळी, श्री अरुण कुमार एडके, श्री स्नेहल एडके, सौरभ एडके, श्री गजानन घाटे  कायदे सल्लागार , श्री बारसू सीताफळे माजी कोषाध्यक्ष हे आवर्जून उपस्थित होते . या कार्यक्रमाची ऑनलाइन लिंक पाठवण्यात आली होती त्यामुळे सर्वांना दर्शनाचा लाभ घेता आला, प्रसाद म्हणून सर्वांना सुंठवडा देण्यात आला, या कार्यक्रमासाठी अंबरनाथहून श्री गोपाळ थोरात, संपादक श्री उदय कुमार साळी माजी अध्यक्ष, श्री अविनाश धोत्रे सहसंपादक यांची विशेष उपस्थिती होती. चहापान ,अल्पोपहार झाला. हा छोटेखानी समारंभ स्वर्गीय आनंदात, हास्यकल्लोळात संपन्न झाला.

कै. प्रल्हाद एकनाथ काजवे, कै. मालनबाई प्रल्हाद काजवे, कै. मथुराबाई प्रल्हाद काजवे यांच्या स्मरणार्थ
डॉ. पुरुषोत्तम प्रल्हाद काजवे, रत्नागिरी यांच्या सौजन्याने पृष्ठदान.

# श्री स्वकुळ साळीं समाज डिंडोली विभाग व महिला मंडळ सुरत





द्वारा आयोजितभगवान श्री जिव्हेश्वर जन्म उत्सव व मेहंदी  आयोजन करण्यात आले होते सकाळी सहा वाजता जन्मोत्सव व पोथी वाचन तसेच सत्यनारायण भगवान ची कथा व मेहंदी आयोजन कार्यक्रमाची सुरुवात झाली त्यात एकूण 80 महिलांच्या हातावर फ्री मेहंदी काढण्यात आली मेहंदी काढण्यासाठी एकूण बारा (१२) मुलींनी सहभाग घेतला होता मेहंदी काढणाऱ्या सर्व मुलींचा गिफ्ट देऊन सत्कार करण्यात आला कार्यक्रमात विभागीय कार्याध्यक्ष श्री रामचंद्र नारायण भुतकर (बापू भाऊ) (उपाध्यक्ष श्री केंद्र समिति).तसेच विभागीय अध्यक्ष श्री संजय भाऊ सुरेश बुलबुले तसेच जनरल सेक्रेटरी श्री किरण हरिदास भंबाळे (गुरुजी) प्रमुख अतिथी श्री डॉ. शैलेश झींझाळा यांनी कार्यक्रमास मार्गदर्शन केले. जन्मोत्सव व मेहंदी कार्यक्रमाची संपूर्ण जबाबदारी व आयोजन डिंडोली विभाग महिला मंडळ चे अध्यक्ष सौ रेखा बाई रमेश दातरंगे उपाध्यक्ष गं.भा.वंदनाबाई अशोक शेठ भोगरे सेक्रेटरी सौ चांदणी बाई सुनील बुलबुले सौ रुपाली पांडुरंग डहाके सौ अर्चना राजू धरम सौ अरुणा बाई वाझट सौ जयाबाई बुलबुले सौ राधाबाई भुतकर सौ आशाबाई पाटेकर सौ तृप्तीबाई दातरंगे तसेच महिला मंडळाचे पदाधिकारी कार्यकारणी सदस्य सल्लागार मंडळ द्वारा करण्यात आले होते कार्यक्रमास शुभेच्छा भेट लिंबायत विभागाचे अध्यक्ष भरत नारायण नाशिककर व रमेश भाऊ सातपुते तसेच डॉ. श्री अरुण कुमार सातपुते डॉ. श्री पंकज कुमार सातपुते यांनी दिली कार्यक्रमास विभागीय सर्व पदाधिकारी व कार्यकारिणी सदस्य सल्लागार मंडळ यांची उपस्थिती होती कार्यक्रमाची सुरुवात सकाळी सहा वाजता विभागीय सेक्रेटरी श्री जगन्नाथ सोनू शेठ पाटेकर यांनी भगवान श्री जिव्हेश्वर पोथी  वाचून सुरू झाली व कार्यक्रमाचे समारोपन तीन वाजता करण्यात आले कार्यक्रमास विभागीय सभासद व मोठ्या संख्येने महिला उपस्थित होत्या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विभागीय सह सेक्रेटरी राहुल अनिल लष्करे यांनी केले जय जिव्हेश्वर

कै. मालिनी श्रीकृष्ण साळी (भूत्कर) यांचे स्मरणार्थ श्री. श्रीकृष्ण नथुराव साळी (सर), पवई - मुंबई यांच्या सौजन्याने पृष्ठदान.



## एरंडोल, श्री स्वकुळ साळी समाज तर्फे जिव्हेश्वर भगवान जन्मोत्सव समाज मंदिरा त साजरा करण्यात आला.

## शहादा जि. नंदुरबार - भगवान जिव्हेंश्वर जन्मोत्सव





आज 20 ऑगस्ट 2021 रोजी आपले आराध्य दैवत भगवान श्री.जिव्हेश्वर यांचा जन्मोत्सव शहादा जि. नंदुरबार येथील श्री जिव्हेश्वर साळी समाज भवन येथे समाज बाधवांच्या व महिला भगिनीच्या उपस्थितीत मोठ्या उत्साहात संपन्न झाला. त्यातील काही क्षणचित्रे

## अंजनगाव येथील काठीपुरा- भगवान जिव्हेंश्वर जन्मोत्सव

अंजनगाव येथील काठीपुरा येथील 1955 पासून असलेले भगवान श्री जिव्हेश्वर यांच दिनांक 20/8/2021 शुक्रवार रोजी साळी समाजाचे आराध्य दैवत ज्यांनी वस्त्राची निर्मिती करून सर्व मानव जातीचे लज्जा रक्षणाचे कार्य केले ज्यांचा जन्म शंकराच्या जिव्हेतून झाला म्हणून त्यांचे नाव भगवान जिव्हेश्वर! आज त्यांचा जन्मोत्सव मोठ्या उत्साहात कोरोना चे नियमांचे लक्ष करून साजरा करण्यात आला सकाळी 6 वाजता भगवान श्री जिव्हेश्वर जन्म झाला नंतर अभिषेक नव दांपत्य श्री घनश्याम किरोले व सौ रोशनी किरोले आणि श्री व सौ सरोदे यांच्या हस्ते पूजन झाले व आरती करण्यात आली सर्व महिलां मंडळ आणि पुरुष बांधवांनी भगवान जिव्हेश्वर ची प्रार्थना व स्तोत्र गायले या कोरोना महामरीपासून सर्वांचे रक्षण कर असे साखडे देवाला समाजबधवांनी घातले आणि दुसऱ्या दिवशी दुपारी जिव्हेश्वर महिला मंडळ भजन झाले मग 40 वर्षांपासूनचालत आलेली परंपरा भगवान श्री जिव्हेश्वर यांची पालखी मंदिरातल्या मंदिरात फिरविणायत आली नं तीर्थ उठल्यावर हभप श्री फाटे गुरुजी यांनी काल्याचे कीर्तन केले आणि मग गोपाळकाला झाला आणि कार्यक्रमाची सांगता झाली कार्यक्रम मंदिराचे संस्थांचे विश्वस्त अध्यक्ष श्री मनोहर असलमोल , उपाध्यक्ष श्री दिवाकर मेन, सचिव श्री रवींद्र खरड,रवींद्र बुरांडे,प्रा. राजेंद्र कहाणे, संजय घाटे श्री गोपाळ ठणगंन , शुभांगी पाटणकर, ऍड प्रदीप कीचंबरे श्री दिलीप तवले, आणि साळी समाज समाजबांधव आणि महिला मंडळ , सल्लागार मंडळ, युवा मंडळ आणि युवती भगिनी यांचे उपस्थितीत पार पडला कार्यक्रम च्या यशस्वीतेसाठी सर्व समजबधवांनी सहकार्य केलं

**वृत्त सौ शुभांगी पाटणकर अंजनगाव सुर्जी 8379935352**

कै. श्री. तुकाराम रामचंद्र वखारे (वडील), कै. श्रीमती सुलोचनाबाई तुकाराम वखारे (आई) व
कै. श्री. सुभाष तुकाराम वखारे (भाऊ) यांच्य स्मरणार्थ श्री. सुरेश तुकाराम वखारे (अहमदनगर) यांच्या सौजन्याने पृष्ठदान.

## मनमाड - भगवान जिव्हेंश्वर जन्मोत्सव



मनमाड वृत्त - भगवान जिव्हेंश्वर जन्मोत्सव मंगलमय वातावरणात मोठ्या उत्साहाने मनमाड साळी समाजाचे अध्यक्ष सन्माननीय प्रमोद उत्तमराव निकुंभ, शांती नगर यांच्या निवासस्थानी साजरा करण्यात आला.

सदर उत्सव हा शासनाने निर्बंध घातलेल्या नियमानुसार साजरा करण्यात आला. यावेळी समाजातील ज्येष्ठ समाज बांधव उपस्थित होते. कार्यक्रम आरती व प्रसाद वाटप करुन सांगता करण्यात आली. .

## एरंडोल - भगवान जिव्हेंश्वर जन्मोत्सव

एरंडोल, श्री स्वकुळ साळी समाज तर्फे जिव्हेश्वर भगवान जन्मोत्सव समाज मंदिरा त साजरा करण्यात आला.





## श्री डी. जी. निमकर, ठाणे यांच्या निवासस्थानी श्री जिव्हेश्वर जन्मोत्सव.



## " जळगांव साळी माता महिला मंडळ - भगवान जिव्हेंश्वर जन्मोत्सव








" जळगांव साळी माता महिला मंडळ " लॉंकडाऊनच्या या प्रदिर्घ काळानंतर प्रथमच दिनांक २०/ ८/ २१ शनिवार श्री.जिव्हेश्वर जयंती जल्लोषात साजरी केली.जयंतीचे अवचित्त साधून समाजातीलच श्रीमती मंदाताई साळी यांना वाण सामान देवून सामाजिक उपक्रम राबविला , तसेच मंडळाच्या अध्यक्षा सौ.पूष्पलता रविंद्र साळी यांनी स्वखर्चातुन १० वीत सर्वात्तम मार्क मिळालेल्या विद्यार्थिनींचा सत्कार केला,कु.तन्वी संदीप बागुल व कु. वैष्णवी बाळू साळी या दोघीच विद्यार्थिनी कार्यक्रमात उपस्थित होत्या.सौ.प्रमिला पाठक व इतर भगीनींनी सुमधूर भजने गायीली , कमीत कमी सभासदांमध्ये नियमबध्दपणे कार्यक्रम संपन्न झाला.उपस्थित सभासदांमुळे कार्यक्रम उत्साहात साजरा झाला. सौ.निर्गुणा दिवटे,जयश्री डहाके, ज्योती साळी, दिपाली खंडारे, पूष्पा भोपाळे, भारती भोपाळे, प्रीती भोपाळे,प्रमिला पाठक,राजश्री साळी,सुलभा साळी,पुनम साळी,सोनाली साळी,निशीगंधा बागुल,संगिता भोगरे,नेहा खंडारे या सर्वांच्या सहकार्याने उत्साहात श्री.जिव्हेश्वर जंयती संपन्न झाली.

**माहीती संकलन - सौ.ज्योती मिलींद साळी**

---



## भिवंडी - भगवान जिव्हेंश्वर जन्मोत्सव

स्वकुळ साळी समाज भिवंडी येथील अध्यक्ष श्री प्रदीप कुमार साळी यांचे निवासस्थानी संस्थेचा भगवान श्री जिव्हेश्वर जयंती उत्सव साजरा करण्यात आला.

# ..बृहन्मुंबई स्वकुळ साळी समाज .. श्री जिव्हेश्वर जयंती उत्सव मंडळ
# भगवान जिव्हेंश्वर जन्मोत्सव




समस्त ज्ञातिबांधव-भगिनी, सप्रेम नमस्कार! जय जिव्हेश्वर!

करोनाच्या पार्श्वभूमीवर यंदाही सलग दुसऱ्या वर्षी ; आपले आराध्य दैवत भगवान श्री जिव्हेश्वरांचा जन्मोत्सव साजरा करण्यावर मर्यादा आल्या. हॉलमध्ये एकत्र येऊन नेहमीच्या उत्साही वातावरणात जन्मोत्सव साजरा करणे शक्य होणार नव्हते. त्यामुळे उत्सव मंडळाचे सचिव श्री. दत्ता साळी यांच्या 'चष्माघर' या ठिकाणी उत्सव साजरा करण्याचे सर्वानुमते ठरले होते. त्यानुसार मिती श्रावण शु. १३ शके १९४३, शुक्रवार दिनांक २० ऑगस्ट २०२१ रोजी पहाटे, श्री जिव्हेश्वर प्रतिमापूजन, पोथी वाचन, पाळणा व आरतीने जन्मोत्सव संपन्न झाला. पूर्वसूचीत केल्याप्रमाणे दिवसभरात सोयीने ज्ञाती बांधव-भगिनी दर्शनासाठी येत होते. पहाटेच्या पूजा व जन्मोत्सव प्रसंगी सचिव श्री. दत्ता साळी व सौ. कांचन दत्ता साळी यांच्यासोबत कार्याध्यक्ष श्री. लक्ष्मण सरोदे उपस्थित होते. पूजेसाठी सकाळी उपस्थित असलेले श्री. राजन साळी, उत्सव मंडळ सदस्य श्री. प्रवीण साळी तसेच 'मुंबई विभाग स्वकुळ साळी समाज (विणकर) महासंघाचे' अध्यक्ष श्री. भास्कर चौधरी यांच्या उपस्थितीत दर्शनानंतर, मुंबईतील विविध समाज संस्था व समाजातील मान्यवरांना फोनवरून महासंघ व उत्सव मंडळाच्या वतीने श्री जिव्हेश्वर जन्मोत्सवाच्या शुभेच्छा देण्यात आल्या.

जवळपास राहणारे ज्ञाती बांधव- भगिनी दर्शनाकरिता आवर्जून आले होते. श्री. भाऊ व सौ. सुधा उगले, सौ. पल्लवी व श्री. हनुमंत कोळेकर, श्री. मनोहर काळे, श्री. दिपक व सौ. संगीता आणि ऋतुजा व सिद्धी हे दिंडे परिवार यांनी दर्शनाचा लाभ घेतला. तसेच कार्याध्यक्ष श्री. शिवाजी मिसाळ यांनी सकाळी दर्शन घेतल्यानंतर संध्याकाळीही ते उपस्थित होते. श्री. अरविंद पोकळे, श्री. गणेश टण्णू, श्री. अमोल टण्णू, श्री. संजीव भोबेकर या ज्ञातीबांधवांनी तसेच सौ. पूजा साळी, सौ. प्रतिभा जांभळे, सौ. नीता मोडक, सौ. काजल मोडक, कुमारी भक्ती जांभळे या ज्ञातीभगिनींनी उत्सवाला भेट दिली. कु.अर्णव साळी, श्री. रोहन साळी यांच्यासह, मुंबईतील भाजपाचे पदाधिकारी व ज्ञातीबांधव श्री. जितेंद्र उद्धव साळी तसेच मनसे पदाधिकारी श्री. संतोष उद्धव साळी या बंधूंनी उत्सवाला आवर्जून भेट दिली. सायंकाळी सहसचिव श्री. अशोक जांभळे व जाहिरात प्रमुख श्री. बाळकृष्ण बावधनकर यांनी उत्सवाला भेट देऊन श्री जिव्हेश्वरांचे दर्शन घेतले. साळी समाजाची वैश्विक ओळख निर्माण व्हावी याउद्देशाने आज इतर समाजाच्या काही प्रतिष्ठितांना आमंत्रित केले होते व यातील उपस्थित प्रत्येकाला 'भगवान श्री जिव्हेश्वर' व 'साळी समाज' याविषयी सविस्तर माहिती देण्यात आली. उपनगरांत राहणाऱ्या अनेक ज्ञातिबांधवांनी आज घरीच, श्री जिव्हेश्वर पुजन करून जन्मोत्सव साजरा केला. तसेच मान्यवरांनी उत्सवासाठी शुभेच्छा दिल्या.

**--- वार्तांकन : श्री. लक्ष्मण सरोदे**

## अंबरनाथ - भगवान जिव्हेंश्वर जन्मोत्सव




स्वकुळ साळी समाज अंबरनाथ समाज संस्थेच्या मालकीच्या जागेवर श्री जिव्हेश्वर पोथी पारायण व जन्मोत्सव पदाधिकारी व समाज बांधव यांच्या उपस्थितीत साजरा करण्यात आला.

---

## श्रीक्षेत्र बदलापूर येथील उत्सवाची क्षणचित्रे.





---



## ठाणे जिल्हा स्वकुळ साळी समाजाच्या कार्यालयात उत्सव प्रसंगी उपस्थित असलेले डोंबिवली स्वकुळ साळी हितवर्धक संस्थेचे पदाधिकारी

कै. लिलाबाई मोरोपंत झिकरे(आई) कै. कांताबाई बाळासाहेब झिकरे यांच्या स्मरणार्थ
श्री. बाळासाहेब मोरोपंत झिकरे, अहमदनगर, श्री. मधुकर मोरोपंत झिकरे, सौ. पद्माबाई मधुकर झिकरे,
श्री. अनिल मधुकर झिकरे, सौ. त्रिवेणी अनिल झिकरे, बडोदा यांच्या सौजन्याने पृष्ठदान.



# ठाणे जिल्हा स्वकुळ साळी समाजाचे अध्यक्ष श्री विनोद सजगुले यांच्या निवासस्थानी ठाणे शहर स्वकुळ साळी समाजातर्फे भगवान श्री जिव्हेश्वर जयंती उत्सव साजरा करण्यात आली.

## श्री सोमनाथजी कासटकर, सल्लागार, डोंबिवली यांच्या स्वगृही भगवान श्री जिव्हेश्वर यांच्या जयंती उत्सव प्रसंगी असलेली उपस्थिती.





## फैजपूर - भगवान जिव्हेश्वर जन्मोतसव



फैजपूर येथील त्रिवेणी वाड्यात साळी समाजाचे दैवत शिवपार्वती पुत्र आद्यवस्त्र निर्माता भगवान श्री जिव्हेश्वर जन्मोत्सव सोहळा उत्सहाने पार पडला.

भगवान श्री जिव्हेश्वर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करुन वंदन करण्यात आले. यावेळी आनंदा वकारे, नंदू साळी, वैभव वकारे, राहूल वराडे, अमोल वकारे, संजय सातपुते, योगेश सूर्यवंशी, ऋषी वकारे, जतिन साळी, योगेश साळी, आदी समाज बांधव उपस्थित होते.

## पारोळा जिल्हा जळगाव - भगवान जिव्हेंश्वर जन्मोत्सव




पारोळा जिल्हा जळगाव येथील स्वकुळ साळी समाजाच्या श्री. जिव्हेश्वर मंदिरात आज दि. 20 ऑगस्ट रोजी भ. श्री. जिव्हेश्वर जयंती खालील प्रकारे साजरी झाली.

सकाळी ब्रह्म मुहूर्तावर भ.श्री. जिव्हेश्वर श्री. गणेश, माता तुळजाभवानी व शंकराच्या पिंडीस दुग्ध शर्करा व पंचामृत स्नान अभिषेक होऊन सूर्योदयाच्या वेळी भ.श्री. जिव्हेश्वर यांची मूर्ती पाळण्यात घालून जन्मोत्सव झाला

यावेळी श्री.जिव्हेश्वर विजय ग्रंथ अध्याय 7 वा. व पाळणा गीताचे पठण झाले. सकाळी ८ वा.श्री सत्यनारायण पूजन अध्यक्षानी सपत्नीक केले. 10 वा. वाजता श्री जिव्हेश्वरी ग्रंथाचेवाचन करून उपस्थित समाज बंधू-भगिनींना श्री. जिव्हेश्वर यांचे चरित्र व कार्य याची माहिती देण्यात आली. त्यानंतर पारोळा येथील मूळ निवासी व्यवसाय निमित्त ठाणे येथे असलेले श्री.बाळकृष्ण ओंकार अढाव यांनी समाजासाठी स्वखर्चाने स्नेहभोजन आयोजित केल्यामुळेव त्यांचा 75 वा वाढदिवस असल्याने औक्षण सत्कार व केक कापून वाढदिवस साजरा झाला. यावेळी त्यांनी केलेल्या योगदानाबद्दल समाजाकडून त्यांना शाल बुके व सन्मान चिन्ह व सन्मानपत्र प्रदान करण्यात आले. यावेळी इ.10 वी व 12 वी मधील गुणवंत विद्यार्थ्यांचा रोख बक्षीस व ट्रॉफी देऊन गुणगौरव केला यावेळी सूत्रसंचालक व संकल्प फाऊंडेशनचे अध्यक्ष प्रा सुभाष अढाव यांनी श्री जिव्हेश्वर मंदिर निर्माण करण्यामागील भावना, मंदिरात देणगी दिलेल्यामहाराष्ट्र, गुजरात व मध्य प्रदेश येथे स्थाईक समाजबांधवांनी मंदिरासाठी दिलेल्या देणगी बद्दल कृतज्ञता व्यक्त करून त्यांचे आभार मानले. मंदिराची नित्य पूजा पाठ करणाऱ्या पुजारी जोडप्याचे वस्त्र व साडी देऊन सत्कार करण्यात आला. व्यासपीठावर अध्यक्षस्थानी मा. अध्यक्ष डॉ. गोकुळ आढाव हे होते. त्यांचे सोबत विद्यमान अध्यक्ष राजेंद्र बागडे व ज्येष्ठ सदाशिव आंबेकर यांचे सोबत सत्कार मूर्ती बाळकृष्ण आढाव होते. त्यानंतर समाज बांधवांनी स्नेह भोजन करून कार्यक्रमाचे सांगता झाली. संपूर्ण दिवस चालेलल्या कार्यक्रमासाठी अध्यक्ष राजेंद्र बागडे, उपाध्यक्ष राजेंद्र आढाव ,सचिव निरज बागडे मा. अध्यक्ष अनिल आढाव, नथू आंबेकर, विद्यमान सदस्य जगदीश बडकस, नवल बडकस ,गणेश बडकस सहित समाज भगिनी, बांधव तसेच युवक मोठ्या संख्येने हजर होते. अत्यंत खेळीमेळीच्या व उत्साहात चाललेल्या कार्यक्रमात 200 लोकांनी तीर्थप्रसाद व स्नेहभोजनाचा लाभ घेतला.

**वृत्तांकन :- प्रा.सुभाष अढाव, संस्थापक संकल्प फौंडेशन पारोळा.**

## औरंगाबाद - भगवान जिव्हेंश्वर जन्मोत्सव






प्रथम वस्त्र निर्माते तथा वेदमूर्ती भगवान जिव्हेश्वरांचा जन्मोत्सव अत्यंत भक्तिभावाने आणि उत्साहाने साजरा करण्यात आला. एन - 8 सिडको विभागातील जिव्हेश्वर कॉलनीतील जिव्हेश्वर मंदिरात जन्मोत्सव संपन्न करण्यात आला.

कोरोनाची पार्श्वभूमी लक्षात घेऊन शासनाच्या नियमानुसार सामाजिक अंतर राखूनच जिव्हेश्वर जन्मोत्सवाच्या कार्यक्रम संपन्न करण्यात आला. सकाळी पहाटे 06:21 वाजता जन्मोत्सव विधी व आरतीचा कार्यक्रम घेण्यात आला.जन्मोत्सवा निमित्ताने जन्मोत्सवाचा पाळण्याचा सोहळा अत्यंत उत्साहाने व आनंदाने फार पाडण्यात आला. यामध्ये महिला सोबतच पुरुष आणि बालगोपाळांनी सहभाग नोंदविला होता. प्रत्येक भक्ताने पुष्प अर्पण करून जिव्हेश्वररांचे दर्शन घेतले. यावेळी जिव्हेश्वर मंदिर व मंगल कार्यालय ट्रस्टचे अध्यक्ष श्री संतोष लोंढे आणि त्यांच्या सर्व टीमने सर्व भक्तांचे स्वागत केले. यावेळी दत्ता वराडे, कैलास धावणे, संजय सरोदे, नवनाथ चोटमल, अशोक राजकडे, संजय कुरे, रवींद्र ढोरजे, खंडेराव भारुड, अशोक ढोरजे, डॉ. सुधाकर लिमकर, गंगाराम बर्वे, श्रीनिवास श्रेष्ठ, बिपिन आचार्य, मनोज शेंद्रे, अनंत पोरे, दत्ता मैंद्रे, दिलीप टपले, विनय बदमोरे , सुरेश कोकणे, मंगल श्रेष्ठ, सुरेखा धावणे, सुनिता सरोदे, अश्विनी राजकडे, लता सरोदे, ॲड. स्वाती लंगोटे, कविता टपले, अनिता लंगोटे,शालिनी बर्व, बोरा बोराखडीकर इत्यादी बहुसंख्येने उपस्थित होते.

कै. सौ. सिंधुताई खंडु कापरे व कै. श्री. खंडु चिंतामणी कापरे यांच्या स्मरणार्थ
श्री. महेश खंडु कापरे (कल्याण) व सौ. संगिता कापरे यांच्या सौजन्याने पृष्ठदान. १०

# निगडी प्राधीकरण येथे जिव्हेश्वर जन्मोत्सव २०२१ विद्यार्थी गुणगौरव साधेपणाने साजरा करण्यात आला.



**भगवान श्री जिव्हेश्वर मूर्तीला हार अर्पण करताना श्री. सुभाष रा. दळवी व अध्यक्ष श्री. एन. बी. मानकर सर**




**इयत्ता १२वी प्रथम क्रमांकाचे पारितोषिक स्वीकारताना कु. ओमकार शशिकांत टपळे. डावीकडून श्री. वसंत नगरकर, ओमकार टपळे, श्री. सुभाष रा. दळवी व श्री. मानकर सर**

निगडी दिनांक २० ऑगस्ट २०२१ - सध्या कोरोनाच्या साथीमुळे बाधीत होण्याचे प्रमाण वाढले असल्याने तसेच कोणत्याही प्रकारचे धार्मिक सण, उत्सव एकत्र साजरे करण्यास शासनाने बंदी घातलेली आहे.

तेव्हा अशा कठीण परिस्थितीत आपले कुलदैवत भगवान श्री जिव्हेश्वर जन्मोत्सव सोहळा प्रत्येक कुटुंबाने दि. २० ऑगस्ट २०२१ रोजी सकाळी आप आपल्या घरीच भगवान श्री जिव्हेश्वरांच्या प्रतिमेची पूजा करुन आपल्या जगापुढील आलेले कोरोनाच्या साथीचे संकट लवकरात लवकर समाप्त होवो, अशी मनोभावे प्रार्थना सर्वांनी आपल्या कुलदैवतापुढे करुन त्यास साकडे घालुन साजरा करावा असे स्वकुळ साळी समाज (विणकर) पिंपरी-चिचवड, देहुरोड व तळेगाव सर्व पदाधिकारी व कार्यकारिणी सदस्यांच्या तर्फे आवाहन करण्यात आले होते.

या दिवसाचे औचित्य साधून मार्च २०२० मधील कोरानाच्या संकटामुळे रखडलेली विद्यार्थ्यांची शैक्षणिक पारितोषिके इयत्ता १०वी व १२वी मधील प्रथम क्रमांक रु. २,५००/-, द्वितीय क्रमांकास रु. १,५००/- व तृतीय क्रमांकास रु. १,०००/- चे धनादेश व प्रमाणपत्र देऊन गौरव करण्यात आला. हा गौरव समारंभ श्री जिव्हेश्वर सांस्कृतिक भवनमधील भगवान श्री जिव्हेश्वर मंदिरासमोर घेण्यात आला.

या प्रसंगी पिंपरी-चिंचवड स्वकुळ समाजाचे अध्यक्ष श्री. एन. बी. मानकर सर,उपाध्यक्ष श्री. मुकुंद तु. साळी, खजिनदार श्री. दिलीप मा. बिडकर, सल्लागार श्री. वसंत रं. नगरकर, श्री. प्रभाकर शंकर अष्टेकर, समाज बांधव सभासद श्री. सुभाष रामचंद्र दळवी, श्री. परशुराम दिवटे, श्री. विजय सातपुते तसेच विद्यार्थ्यांचे पालक श्री. संदिप कृ. मोडगी, सौ. पुनम अभिजीत खडामकर, सौ. मेघना हेमंत मते, सौ. मानसी संतोष मद्रे व श्रीमती मिना सुभाष मुंदानकर हे पालक उपस्थित होते.

पिंपरी-चिंचवड स्वकुळ साळी समाजाची ४७वी वार्षिक सर्वसाधारण सभा याही वर्षी शुक्रवार दि. २०/०८/२०२१ रोजी समाजाचे अध्यक्ष श्री. एन. बी. मानकर सर यांच्या अध्यक्षतेखाली आभासी पध्दतीने घेण्यात आली. समाज बांधवांनी पाठविलेला प्रग्रस्त निधी रु. ३१,०००/- दि. १३/०८/२०२१ रोजी अ.म.स्व.साळी समाज संस्थेला पाठविण्यात आला. सर्व विषयावर चर्चा होऊन श्री जिव्हेश्वर सांस्कृतिक सेवा मंडळ ही समाजाची सहाय्यक संस्था असूनही मुख्य संस्थेला दबावतंत्राखाली काम करावे लागते. यावेळी श्री जिव्हेश्वर सांस्कृतिक सेवा मंडळाने चालवलेल्या मनमानी कारभाराच्या संदर्भात २०२१ च्या वार्षिक सर्वसाधारण सभेत महत्वाचे निर्णय घेण्यात आले. समाजाचे उपाध्यक्ष श्री. मुकुंद तुकाराम साळी यांनी उपस्थितांचे आभार मानुन ही सभा अध्यक्षांच्या परवानगीने संपल्याचे घोषित करण्यात आले.

**वृतांकन - मा. प्राचार्य, नाथा बाळू मानकर**
**अध्यक्ष - स्वकुळ साळी समाज (विणकर)**
**(पिंपरी-चिंचवड-देहूरोड व तळेगांव)**

# रायगड जिल्हा स्वकुळ साळी समाज, मुंबई - भगवान जिव्हेश्वर जयंती उत्सव 2021





भगवान श्री जिव्हेश्वर जयंती उत्सव २०२१रायगड जिल्हा स्वकुळ साळी सेवा मंडळ, मुंबई या संस्थेतर्फे भगवान श्री. जिव्हेश्वरांचा जन्मोत्सव शुक्रवार दिनांक २० ऑगस्ट २०२१ रोजी मुलुंड, मुंबई येथे मंडळाच्या कार्यालयात संस्थेचे पदाधिकारी व समाज बांधव यांच्या उपस्थितीत अत्यंत उत्साहात संपन्न झाला. उत्सवाची सुरुवात भगवान जिव्हेश्वर साळी माहात्म्य विजय ग्रंथाच्या पारायणाने झाली. पारायण मंडळाचे सहसचिव श्री. श्रीराम वैद्य यांनी केले.जन्मोत्सवानंतर समाज भगिनी पुरोहित सौ. सुनीता नरेंद्र अंबुर्ले यांनी श्री. व सौ. सुरेश तिगडे यांच्या हस्ते भगवान श्री. जिव्हेश्वर यांची यथोचित पूजा केली. नंतर भगवान श्री. जिव्हेश्वर यांची आरती व सौ. संगीता अविनाश साळी यांच्या मंजुळ व सुरेल आवाजात पाळणा म्हणून जन्मोत्सव साजरा केला. शासनाच्या नियमानुसार मर्यादित संख्येच्या उपस्थितीत हा उत्सव साजरा होत असताना त्याचा लाईव्ह टेलीकास्ट झूमच्या माध्यमातून सर्व समाज बांधवांना दाखविण्यात आला. त्याचा अनेकांनी लाभ घेतला.

जन्मोत्सवच्या वेळी श्री अविनाश साळी, नंदकिशोर कोळेकर, विजय वाऊळ , अजित साळी, प्रदीप शिपुरकर, श्री. व सौ.अरुण साळी, राम वैद्य , सुभाष हावरे, संजीव अंबुर्ले ,सौ. श्वेता अंबुर्ले, डॉ. अपर्णा निमकर, श्री. व सौ. रविंद्र तांबडे, नरेंद्र आंबुर्ले, व जेष्ठ समाज बांधव श्री. चोपडे आदी मान्यवर उपस्थित होते.गेल्या वर्षी प्रमाणे यावर्षीही विविध कार्यक्रमांचे आयोजन झूम व यूट्यूबच्या माध्यमातून करण्यात आले होते. सकाळी दहा वाजता कार्यक्रमाच्या दुसऱ्या सत्रात प्रसिद्ध निवेदक श्री. राजेश तांबडे यांनी समाजबांधव ॲड. सतिषचंद्र टण्णू यांचा परिचय करून दिला. ॲड. टण्णूसाहेबांनी राजयोग या विषयावर सुंदर निरुपण केले. त्यांनी विविध विषयावर मार्मिकपणे निरुपण करुन तरुण समाज बांधवांना मंत्रमुग्ध केले. दुपारी ११:१५ वा. श्री. राजेश तांबडे यांनी हरहुन्नरी उद्योगपती श्री. संदेश वैद्य, मॅनेजिंग डायरेक्टर OPHTHO INDIA Inc यांची मुलाखत घेतली. सामान्य कुटुंबामध्ये जन्मलेल्या श्री. संदेश वैद्य यांनी एका वेगळ्या क्षेत्रात आपला ठसा उमटवला आहे. श्री. संदेश वैद्य यांनी आपल्या कंपनीच्या उत्कर्षापर्यंत सर्व प्रवास उलगडून दाखविला. त्यामध्ये त्यांना आलेल्या असंख्य अडचणींचा सामना जिद्दीने कसा केला याचे प्रभावीपणे विवेचन केले. तसेच तरुण पिढीला या व्यवसायामध्ये येण्यासाठी मार्गदर्शन केले. त्यांच्या कंपनीतर्फे समाजोपयोगी विविध कार्यक्रम केले जातात याचा समाज बांधवांनी उपभोग घ्यावा असे आवाहनही केले. OPHTHO INDIA Inc ही कंपनी

डोळ्यांच्या ऑपरेशन साठी लागणारी सर्व साधन सामग्री फक्त भारतातच नव्हे तर परदेशातही उपलब्ध करून देते. आज श्री. संदेश वैद्य यांचा व्यवसाय हा खऱ्या अर्थाने इंटरनॅशनल झाला आहे. समाजातील कोणत्याही व्यक्तीला डोळ्याच्या ऑपरेशनसाठी मोफत मदत करण्याचं आश्वासनही त्यांनी यावेळी दिले. या मुलाखती मधून श्री. संदेश वैद्य यांची व्यवसायातील झेप किती मोठी आहे याची कल्पना समाज बांधवांना आली असेलच. या मुलाखतीमधून आम्हाला एक यशस्वी उद्योजक ज्ञात झाला आणि तो आमच्या मंडळाचा सक्रिय कार्यकर्ता आहे याचा मंडळाला नक्कीच सार्थ अभिमान आहे.

कार्यक्रमाच्या तिसऱ्या सत्रात श्री. राजेश तांबडे यांनी LIFE CARE INVESTMENT कंपनीच्या Financial Planner श्री. प्रसाद डोईफोडे व सौ. नेहा डोईफोडे यांची यशोगाथा उलगडणारी मुलाखत घेतली. सौ. नेहा डोईफोडे यांनी या क्षेत्रात अतिउच्च कामगिरी केली आहे. मुलाखतीत इन्व्हेस्टमेंट करताना कोणत्या गोष्टीचा विचार केला पाहिजे याचे उत्कृष्ट विवेचन केले. सौ.नेहा व प्रसाद हे आजमितीस २००० कुटुंबांचे फायनान्शिअल प्लॅनर म्हणून काम करीत आहेत हे ऐकून अभिमान वाटला. सौ नेहा अनेक वर्ष इन्व्हेस्टमेंट क्षेत्रात कार्यरत असून त्यांनी गेली १५ वर्ष सातत्याने या क्षेत्रातील मानाचा MDRT पुरस्कार मिळवला आहे. त्याच प्रमाणे गेली तीन वर्षे त्यांनी COT आणि गेल्यावर्षी TOP OF THE TABLE हा मानाचा सर्वोच्च पुरस्कार मिळवला आहे. हा पुरस्कार भारतात आतापर्यंत फक्त २५ जणानाच मिळाला असून त्यामध्ये आपले एक समाजबांधव आहेत याचा सार्थ अभिमान आम्हाला आहे. त्यासाठी त्यांनी घेतलेले कष्ट, निष्ठा, सचोटी मेहनत याची गणना करणे कठीण आहे. जीवनात इन्शुरन्सचे महत्व नमूद करताना प्लॅनिंग अत्यंत गरजेचे आहे याची त्यांनी अनेक उदाहरणे दिली. या क्षेत्रात काम करण्यास फार मोठा वाव आहे आणि त्याचा तरुणांनी लाभ घ्यावा असे आवाहन केले. समाजातील तरुणांना मार्गदर्शन करण्याचाही मनोदय त्यांनी व्यक्त केला. या दोन्ही मुलाखतीमुळे आपल्या समाजातील हे युवक कसे यशस्वी उद्योजक झाले व त्यापासून तरुणांनी बोध घेऊन आपली व समाजाची उन्नती करण्यासाठी हे मार्गदर्शन नक्कीच उपयोगी पडेल. याची खात्री वाटते.कार्यक्रमाच्या चौथ्या सत्रात प्रथम दहावी, बारावी, पदवीधर आणि पोस्टग्रज्युएट झालेल्या विद्यार्थ्यांना मंडळातर्फे देण्यात येणारी बक्षिसे जाहीर करण्यात आली. बक्षीसपात्र सर्व विद्यार्थ्यांना बक्षिसांची रक्कम त्यांच्या बँक खात्यात जमा केली जाईल असे कार्यक्रमाचे निवेदक श्री. राजेश तांबडे यांनी जाहीर केले त्यानंतर समाजातील कलाकारांना प्रोत्साहन देणारा श्री. राजेश तांबडे यांच्या संकल्पनेतील Digital करमणूक हा कार्यक्रम यूटूयब च्या माध्यमातून आयोजित करण्यात आला. समाजातील जवळ जवळ ३५ युवक-युवती, समाजबंधू-भगिनींनी या कार्यक्रमात सहभाग घेतला. अगदी चार वर्षाच्या लहान मुली पासून ज्येष्ठ समाज बांधवांनी आपली कला पेश केली या संपूर्ण कार्यक्रमाचे नियोजन संकल्पना प्रसिद्ध निवेदक श्री. राजेश तांबडे यांनी केले होते.कार्यक्रमाच्या मध्यंतरी मंडळाचे अध्यक्ष श्री. अविनाश साळी यांनी मंडळाच्या विविध उपक्रमांचा आढावा घेताना गेल्या दोन वर्षांतील कोव्हिड महामारीमुळे व शासकीय निर्बंधांमुळे मंडळाला अनेक उपक्रम रद्द करावे लागले याबद्दल खेद व्यक्त केला. गेल्या दोन वर्षात मंडळाने नैसर्गिक आपत्ती, अतिवृष्टीमुळे आलेला महापूर, आजारी व्यक्ती तसेच गरजू विद्यार्थी यांना केलेल्या मदतीचा थोडक्यात परामर्श घेतला. गेल्या दोन वर्षांत मंडळाने ५ ते ६ लाखाची मदत गरजू समाजबांधवांना करण्यात आल्याचेही त्यांनी आवर्जुन नमूद केले. मंडळ गेली दोन वर्ष सोशल मीडियाच्या माध्यमातून समाज बांधवांच्या संपर्कात असून देणगी/उत्सव वर्गणी देखील ऑनलाइनच्या माध्यमातून जमा करत आहे. मंडळाच्या प्रत्येक आवाहनाला

समाज बांधवांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असल्याचेही अध्यक्ष श्री. अविनाश साळी यांनी आवर्जुन नमूद केलं. जागतिक हवामान खात्याच्या इशाऱ्यानुसार यापुढेही भविष्यात चक्रीवादळ, महापुर, रोगराई तसेच आपत्कालीन परिस्थिती येऊ शकते आणि त्याचा अतिशय विपरीत परिणाम समाज बांधवांच्या आर्थिक परिस्थितीवर व पर्यायाने जीवनावर होऊ शकतो या जाणीवेतून मंडळाने आपत्कालीन सहाय्य निधी निर्माण करण्याचा निर्धार केला आहे. येत्या वर्षभरात १५ लाखांचा आपत्कालीन सहाय्य निधी जमा करावयाचा मानस असून या उत्सवापासूनच त्याची सुरुवात केली आहे. आपत्कालीन सहाय्य निधीसाठी मंडळाचे ज्येष्ठ समाजबांधव दानशूर श्री. नंदकुमारजी शिपूरकर यांनी ₹. १,०१००० /- ची भरभक्कम देणगी देऊन श्रीगणेशा केला आहे. या आपत्कालीन निधीसाठी आज पर्यंत १५८ समाजबांधवांनी योगदान दिले आहे. अध्यक्ष श्री. अविनाश साळी यांनी आपल्या भाषणात मंडळाने गेल्या दहा वर्षात जे विविध कार्यक्रमाचे आयोजन केले त्याचा उहापोह करतांना त्यामध्ये प्रामुख्याने मंडळाचे माणगाव येथील जिल्हास्तरीय अधिवेशन, वेबसाईटची निर्मिती व प्रकाशन, मंडळासाठी मिळविलेले कार्यालय, २०१७ मध्ये वाशी येथे झालेले अखिल महाराष्ट्र स्वकुळ साळी समाज संस्थेच्या चौथ्या अधिवेशनाचे यजमानपद आणि ते "न भूतो न भविष्यती" अशा स्वरूपात संपन्न झाल्याचा मंडळाला अभिमान आहे याचाही उल्लेख केला.

आज महाराष्ट्रातील विविध संस्थांमध्ये आपल्या मंडळाचे जेष्ठ कार्यकर्ते विविध पदावर कार्यरत आहेत याचा मंडळाला अभिमान आहे. तसेच यापुढेही आपल्या जिल्ह्यातील समाज बांधवांनी विविध स्तरावर कार्य करून मंडळाचे नाव मोठे करावे असे आवाहन केले. मधल्या काळात मंडळाचे तीन खंद्दे पदाधिकारी यांनी या जगाचा निरोप घेतला आणि त्यांची मंडळाला नेहमीच उणीव भासत आहे ही भावनाही व्यक्त केली. आज पर्यंत मंडळाच्या प्रत्येक आवाहनाला समाज बांधवांनी दिलेल्या उत्स्पूर्त प्रतिसादामुळे तसेच समाजबांधवांच्या मंडळाच्या कार्यकारणीवरील विश्वास व प्रेम यामुळेच मंडळाचे कार्य उत्तमरीत्या चालू आहे हे नमूद केलं. आज मंडळाची आर्थिक स्थिती चांगली असून यापुढेही समाजबांधवांनी मंडळाला आर्थिक सहकार्य करावे असे आवाहन केले आहे. सांस्कृतिक कार्यक्रमात श्री. राजेश तांबडे, नरेंद्र अंबुर्ले, राजेंद्र साळी, संतोष कांबळी, सौ. संगीता साळी, सौ. प्रणिता शिपुरकर, सौ. स्नेहा साळी कु. शिवानी साळी, प्राजक्ता शिपुरकर, कुमारी आर्वी व कुमारी प्रिशा अभिजीत साळी, नॉर्वेहून कुमारी कीर्ती गणेश तिगडे, अन्वी महिंद्रा अंबुर्ले, मिताली उदय वैद्य व इतर कलाकारांच्या सहकार्यामुळे कार्यक्रम खुप छान झाला.कार्यक्रमांची सांगता सौ. स्नेहा राजेंद्र साळी यांच्या पसायदानाने झाली.कार्यक्रमाचे नियोजक श्री राजेश तांबडे यांनी सर्व कलाकारांचे तसेच प्रमुख पाहुण्यांनी मुलाखत देऊन कार्यक्रम यशस्वी केल्याबद्दल आभार मानले. सोशल मिडीयाची तांत्रिक बाजू सांभाळणारे श्री. ओमकार यांचेही आभार मानले. पुढील वर्षी प्रत्यक्ष भेटून भगवान श्री. जिव्हेश्वर जयंती उत्सव साजरा करण्याचा मानस व्यक्त करुन सर्वांनी आभासी पद्धतीने एकमेकांना निरोप दिला.

**वृतसंकलन- श्री. नंदकिशोर कोळेकर, सचिव**



## जागतिक विणकर दिन

जागतिक विणकर दिनानिमित्त भगवान श्री जिव्हेश्वरांची आरती व पूजन श्री.सोमनाथजी कासटकर माजी अध्यक्ष, अखिल म.स्व.सा.स.संस्था यांच्या राहत्या घरी करण्यात आले.सोबत उपाध्यक्षा ,अ.म.स्व सा.स.सं सौ.शैलजा कासटकर आणि परिवार.

---

## राष्ट्रीय हातमाग / विणकर दिवस साजरा



आज दि. 7 ऑगस्ट 2021 रोजी सायंकाळी 7 वा. भ. श्री. जिव्हेश्वर मंदिर, पारोळा येथे मोठ्या उत्साहात संपन्न झाला.

स्वकुळ साळी समाज व संकल्प फाउंडेशनच्या संयुक्त विद्यमाने हा कार्यक्रम संपन्न झाला. भ. श्री. जिव्हेश्वर व हातमागाचे पूजन करण्यात आले. यावेळी बोलताना प्रा. सुभाष अढाव यांनी हातमाग निर्मिती व भ. श्री. जिव्हेश्वर यांच्या जीवन कार्याचे विवेचन केले. तर रोहिणी फंड यांनीजिव्हेश्वरांच्या वेदशास्त्र अभ्यासबाबत माहिती दिली. कार्यक्रमास मा. अध्यक्ष सर्वश्री अनिल अढाव, नथु आंबेकर, सूरज बागडे,अनुप फंड, रोहिणी फंड, गणेश बडकस,इ उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी अध्यक्ष राजेंद्र बागडे, पुजारी अशोक साळी यांनी परिश्रम घेतले.

साळी हिताय,
स्वकुळ संवर्धनम्।



।। श्री जिव्हेश्वर प्रसन्न।।
**ठाणे जिल्हा स्वकुळ साळी समाज संचालित**
नोंदणी क्र. ई/९२८/ठाणे दि. १७/५/८८
**अखिल भारत स्वकुळ साळी समाज मान्यताप्राप्त**

# स्वकुळ समाचार

RNI NO.: MAHMAR/2014/57230
**कार्यालय :** फ्लॅट नं. १, साईसेवा नं.२ को. ऑप. हौ. सोसा., जन. अरुण कुमार वैद्य चौक, गांधीनगर, मानपाडा रोड, डोंबिवली (पूर्व). ४२१२०१


## दिपावली विशेषांक २०२१


**अध्यक्ष :** श्री. विनोद वसंतराव सजगुले, ९८९२३९३३७१
**उपाध्यक्ष :** श्री. प्रकाश वासुदेव पावले, ८८०६९८७५६४
**उपाध्यक्ष :** श्री. बाळकृष्ण ओंकार आढाव, ९७५७०८६९१५
**सेक्रेटरी :** श्री. राजेश शंकरराव साळी, ९९६७५८४०३२
**सहसेक्रेटरीः** सौ. शैलजा सोमनाथ कासटकर, ९८२०१४५४५१
**कोषाध्यक्ष :** श्री. ईश्वरलाल एकनाथ फंड, ८६५२२१५१६३
**अंतर्गत हिशोब तपासणीसः** श्री. बारसु सिताफळे, ९३२६१८२४३५
**कायदेशीर सल्लागारः** ॲड. श्री. गजानन सदाशिव घटे, ९८३३५२७१२२
**आर्थिक सल्लागारः** श्री. नितीन ढवण(सी.ए.), ९८२२४५६७६६

**संपादक :** श्री. गोपाळ सुकलाल थोरात, ७७०९३१५४९८
**सहसंपादक :** श्री. अविनाश शंकर धोत्रे, ९५०३३१२५६६
**सहसंपादक :** श्री. रमेश विष्णुदास बारगजे, ९८६९४८३६००
**संपादक मंडळ सदस्य :** श्री. पुरुषोत्तम जगन्नाथ साळी, ८४२१९१०४३७
श्री. सुधाकर शिंदे-९३२२०५९७४७, श्री. शशिकांत डहाके
**तांत्रिक समितीः** श्री. उदयकुमार साळी,९३२३३८६१३९(तांत्रिक सल्लागार व सामान्य प्रशासन ठाणे जिल्हा)
**तांत्रिक समिती सदस्यः** श्री. राजेश जगन्नाथ साळी-९२०९२०३६९६,
श्री. पंकज अरुण दिवटे-९८२०८८२२८९
**वेब डिझायनरः** श्री. बाळकृष्ण साळी, सुरत- ९०३३६०३६१३

**सल्लागारः** श्री. भालचंद्र नेमिचंद साळी, ९००४४४५१८१, श्री. सोमनाथ रतिलाल कासटकर, ९८२०८२१७२६,
डॉ. किसनराव जगन्नाथ जेधे, ९८३३८२०६०१, श्री. बाळकृष्ण ओंकार आढाव, ९७५७०८६९१५


स.न.वि.वि. जय जिव्हेश्वर,

ठाणे जिल्हा स्वकुळ साळी समाज संचालित **स्वकुळ समाचार** हे समाज जागृतीचे, संघटनाचे, प्रबोधनाचे, समाजात जवळीक साधण्याचे कार्य करीत आहे. स्वकुळ समाचाराचा दिवाळी विशेषांक विविध साहित्याने नटलेला, वाचनीय, आकर्षक व संग्राहक अशा स्वरुपात प्रसिध्द करण्यासाठी वाचक रसिकानी आपले विविध साहित्य, लेखन दि. २० ऑक्टोंबर २०२१ पर्यंत त्वरीत पाठवावे. आपण सर्वांनी भरभरुन दिलेल्या सदिच्छा, आपले सहकार्य स्वकुळ समाचार परिवारास प्राप्त झाले आहे. त्याच स्फुर्ती व सामाजिक बांधिलकीतून स्वकुळ समाचार दीपावली विशेषांक २०२१ भगवान श्री जिव्हेश्वर कृपेने आपल्या सर्वांच्या सहकार्याने व आशिर्वादाने सरस्वती चरणी अर्पण करुन सभासदांना दि. ०२ नोव्हेंबर २०२१ रोजी रवाना केला जाईल. मराठी माणसात दिवाळी अंकांचे महत्त्व खुप आहे. स्वकुळ समाचारचा दिवाळी अंक देखील देखणा असतो. कथा, काव्य, स्पर्धा निमित्ताने अनेक समाजबांधव-भगिनी दिवाळी अंकात योगदान देतात.

यावर्षी आपण दिवाळी अंकाचे मानकरी व्हा.

बालकांसाठी - लहानांसाठी वय १२ वर्षापर्यंत आपण बाल कविता पाठवू शकता. विषयांचे बंधन नाही. मात्र कविता जास्तीत जास्त २० ओळींपर्यंत असावी. किंवा एवाद्या बालकाने-बालिकेने विशिष्ट छंद जोपासला असेल तर त्याची माहिती पाठवा.

तरुणांसाठी - आमचे तरुणांना आग्रहाचे आमंत्रण. कथा-काव्य आपणास नाही जमत जाऊ द्या. आपण तंत्रज्ञान, इंटरव्हयू टेक्नीक, तंत्रज्ञानाचे भवितव्य, परीक्षा यावर स्वअनुभवावर निश्चीत लेख लिहू शकाल. आर्टस्, कॉमर्स, सायन्स, टेक्नॉलॉजी, मेडिकल, इंजिनिअरींग ..... विषयाचे बंधन नाही. जास्तीत जास्त १५०-२०० शब्दांची मर्यादा.

वृद्धांसाठी - सिनिअर सिटीझन्स हे तर समाजाचे मार्गदर्शक. त्यांचा अनुभव, विचार, मार्गदर्शन, प्रॉब्लेम्स, नवीन पिढीविषयी मत-मत भिन्नता आपण शब्दबद्ध करा. नको उपमा-अलंकार फक्त सोपी भाषा पण ह्दयाला जावून भिडणारी. आपण लेख २०० शब्दांपर्यंत पाठवू शकता. लेख पाठवतांना नांव, पूर्ण पत्ता, मोबाईल नंबर जरुर लिहा. आपला हा दिवाळी अंक अधिकाधिक वाचनीय होण्यासाठी आपण सहकार्य करावे ही विनंती. समाजसेवेचे व्रत घेतलेल्या या सामाजिक चळवळीच्या यज्ञास आर्थिक सहकार्यरुपी समिधांची अत्यंत जरुरी आहे. तरी आपण आपल्या व्यवसायाची, संस्थेची वा आपली वैयक्तिक बहुमोल जाहिरात देऊन या सामाजिक बांधिलकीतून उतराई होण्यासाठी या समाज चळवळीत सहभागी व्हावे ही नम्र विनंती.

**आपले नम्रः श्री. विनोद वसंतराव सजगुले, अध्यक्ष**

| २१९) सौ. ललिता पंडित साळी, एरंडोल | १,५०१ | २२०) श्री. राजकुमार दौलतराम देवकर, इंदौर | २,६०० |
| २२१) श्री. शरद खुशाल बोर्डे, विरार | १,५०० | २२२) श्रीमती लता अर्जुन निचळ, नाशिक | १,५०१ |
| २२३) श्रीमती वंदना परशुराम हावरे, गोरेगांव | १,५०१ | २२४) श्री. प्रकाश देवराम दाहोत्रे, पुणे | १,५०१ |
| २२५) सौ. हेमलता विजयकुमार साळी, मुलंड | १,५०१ | २२६) श्री. दिलीप मारोतराव ढोरजे, पुणे | १,५०१ |
| २२७) श्री. सुरेशचंद्र नारायण धारणकर, नाशिक | १,५०१ | २२८) सौ. शशिकला सुरेशचंद्र धारणकर, नाशिक | १,५०१ |
| २२९) श्री. अभिजीत जयंत साळी, मुलुंड | १,५०१ | २३०) सौ. दीपश्री धोंडू निमकर, ठाणे | २,१०० |
| २३१) श्री. रविंद्र गुलाबराव साळी (धरम), चाळीसगांव | १,५०१ | २३२) सौ. शशिकला रविंद्र साळी (धरम), चाळीसगांव | १,५०१ |
| २३३) श्री. प्रविण दत्तात्रय उपरे, पुणे | १,५०१ | २३४) श्री. प्रकाश मल्हारी बुलबुले, चोपडा | १,५०१ |
| २३५) श्रीमती शोभा भास्कर खंडारे, डोंबिवली | १,५०१ | २३६) श्रीमती सविता सत्यवान पाटील, भांडूप | १,५०० |
| २३७) श्री. देविदास गंगाराम डहाके, जळगांव | १,५०० | २३८) श्री. योगेश दत्तात्रय मते, पुणे | १,५०१ |
| २३९) श्री. एकनाथ रखमाजी पंडीत, नाशिक | १,५०१ | २४०) श्री. दिलीप गजानन हरवंदे, चिपळूण | १,५०० |
| २४१) श्री. शंकरराव दत्तात्रय गायकवाड, नाशिकरोड | १,५०१ | २४२) श्री. सुरेश विष्णु हेमाडे, वडगाव(बुद्रुक) | १,५०१ |
| २४३) श्री. सतीश एकनाथराव मांजरे, कल्याण | १,५०१ | २४४) श्री. प्रभाकर गुरुनाथ कापसे, कल्याण | १,०११ |
| २४५) श्री. अरुण रामकृष्ण धमाले, बदलापूर | १,५०१ | २४६) श्री. धनंजय गणपत जठार, खडपोली चिपळूण | १,००० |
| २४७) सौ. मंगला संभाजी ढवण, चिपळूण | १,५०१ | २४८) श्री. मल्लीकार्जुन तिप्पणा धोत्रे, गुलबर्गा (कर्नाटक) | १,५११ |
| २४९) श्री. हरिष मधुकर अष्टेकर, मुंबई | १,५०१ | २५०) श्री. दिपक सदाशिव जंत्रे, अंधेरी, मुंबई | १,५०१ |
| २५१) श्री. गजानन भिकू सागावकर, पेठमाप, चिपळूण | १,५०१ | २५२) श्री. विजय तुकाराम कांदेकर, बदलापूर/पुणे | २,००० |
| २५३) सौ. श्री. विनिता विजय कांदेकर, बदलापूर/पुणे | २,००० | | |

कै. सौ. पार्वती शंकर वैद्य (आई), कै. श्री. शंकर नारायण वैद्य (वडिल) दाभोळ, कै. सौ. उषा रामदास वैद्य (नाशिक) यांच्या स्मरणार्थ श्री. रामदास शंकर वैद्य (नाशिक) व श्री. गजानन शंकर वैद्य, ठाणे यांच्या सौजन्याने पृष्ठदान. १२

## अहवालसाळी समाज इतिहास व संस्कृती संशोधन व साळी समाज जिल्हा इतिहास संशोधन

**विनित :-श्री. डी.जी. निमकर,**

**ॲडमीनसाळी समाज : इतिहास व संस्कृती : संशोधनसाळी समाजाचा इतिहास व संस्कृतीचे पुनरावलोकन करण्यासाठी अ. भा. स्व. सा. समाज (विणकर) या संस्थेच्या आधिपत्याखाली समाजातील ज्येष्ठ बांधव श्री. डी.जी. निमकर, श्री. मो. नि. ठोके आणिइतिहास तज्ञ श्री. ल. रा. लोणकर यांनी या विषयाची मुख्य व जिल्हा ग्रुपमध्ये विभागणी करून दि. १६ ऑगस्ट २०२१ रोजी दु. ४ वा. आभासी सभा बोलावली या सभेचे इतिवृत्तपुढील प्रमाणे.....**

अहवाल साळी समाज इतिहास व संस्कृती संशोधन व साळी समाज जिल्हा इतिहास संशोधन या ग्रुपची आभासी गुगल मीट सभा दि . १६ . ८ . २०२१ चा अहवाल

साळी समाज इतिहास व संस्कृती संशोधन व साळी समाज जिल्हा इतिहास संशोधन या दोन्ही ग्रुपची आभासी गुगल मीट सभा दि . १६ . ८ . २०२१ रोजी सायंकाळी ४ . ०० वा . घेण्यात आली . या सभेला साधारण पणे ३५ सभासद उपस्थित होते . सभेचे अध्यक्षस्थान अ.भा.स्व. साळी समाजाचे अध्यक्ष श्री. रमेशजी चिल्लाळ यांनी भूषविले . तसेच सभेचे सूत्र संचालन प्रा. सुभाष आढाव , अध्यक्ष , संकल्प फाउंडेशन , जळगाव यांनी केले . सभेस उपस्थित असलेल्या सर्व सभासदांचे स्वागत प्रा . आढाव यांनी केले . व मा . रमेश चिल्लाळ , अध्यक्ष , अ.भा.स्व. साळी समाज ; मा . दिलीपराव घट्टे , सरचिटणीस अ.भा. साळी समाज ; तसेच प्रा . ठोके यांच्या परवानगीने सभेस सुरवात करण्यात आली . सभेची विषयत्रिका व चर्चेचे विषय पुढील प्रमाणे .

**विषय पत्रिका**

1) प्रस्तावना व ध्येय धोरण प्रा. मो.नि.ठोके

2) विशेष संबोधन श्री. रमेशजी चिल्लाळ अ.भा.स्व. साळी समाज अध्यक्ष श्री. दिलीप घट्टे सरचिटणीस अ.भा. साळी समाज.

3) विशेष उपस्थिती सहा राज्यांचे समाज अध्यक्ष व सचिव

4) आभार प्रदर्शन श्री. डी.जी. निमकर

5 ) सूत्रसंचालन :- प्रा. सुभाष आढाव

या सभेची प्रस्तावना , सभेचे प्रयोजन , ध्येय धोरण प्रा . मो .नी .ठोके यांनी विषद केले .साळी समाजाचा इतिहास लेखनाचे कार्य करावयाचे असून त्यासाठी साधारणणत: ४ ते ५ वर्षाचा कालावधी लागणार असल्याचे त्यांनी सांगितले . त्याबाबतची कारण मिमांसा देखील केली . साळी समाज इतिहास व संस्कृती संशोधन मंडळाने साळी समाजाचा इतिहास लिहिण्याचे पवित्र काम हाती घेतले आहे . हे पवित्र काम आमच्या हातून पुर्ण व्हावे याकरिता प्रथमतः कुलदेवता चरणी प्रार्थना केली . नंतर श्री. रमेशजी चिल्लाळ अ.भा.स्व. साळी समाज अध्यक्ष श्री. दिलीप घट्टे सरचिटणीस अ.भा. साळी समाज ; सहा राज्यांचे समाज अध्यक्ष व सचिव श्री. डी.जी. निमकर , मुख्य ॲडमिन , सूत्रसंचालक प्रा. सुभाष आढाव , श्री लोणकर , उपस्थित सर्व सभासद यांना उद्देशून त्यांनी प्रस्तावनेस सुरवात केली . प्रस्तावनेच्या सुरूवातीला आपल्या भारत देशाने ७५ व्या वर्षात, अम्रुत महोत्सवी वर्षात पदार्पण करून ७५ वा स्वातंत्र्य दिवस साजरा केल्याबद्दल भारत भूमी , मायभूमीला वंदन केले . आपल्या समाजातील पदाधिकारी व सदस्य श्री किचंबरे , व श्री भागवत यांना सर्वांच्या वतीने श्रध्दांजली वाहिली .

प्रथम इतिहास म्हणजे काय हे समजावून सांगितले . इतिहास म्हणजे भूतकाळात जे जे घडले त्याचा प्रामाणिक वृत्तांत होय . इतिहास म्हणजे राजकिय , सामाजिक , धार्मिक , व आर्थिक घटनांची संगतवार नोंद होय . इतिहास म्हणजे मानवी घडामोडींचा आढावा होय . इतिहास हे एक शास्त्र आहे . दुर्दैवाने आजही इतिहास हे एक शास्त्र आहे हा पुरोगामी विचार घेऊन त्याचा अभ्यास होत नाही याची खंत त्यांनी व्यक्त केली . इतिहासाची व्याख्या पाहिल्यानंतर महाराष्ट्रातील जे प्रमुख इतिहासकार आहेत त्यांचा नामोल्लेख केला . त्यात.प्रामुख्याने बेंद्रे , राजवाडे शेजवलकर , खरे , सरदेसाई , फाटक ,अप्पासाहेब पवार , डॉ . जयसिंगराव पवार यांचा उल्लेख केला . याशिवाय आणखीही इतिहासकार असल्याचे नमुद केले . या दर्जाचा एकही इतिहासकार आपल्या समाजामध्ये झालेला नसल्याबाबतची उणीव त्यांनी नजरेस आणून दिली . आपल्याला आपल्या उणीवांची जाणीव असली पाहिजे असे सांगून ते म्हणाले की उणीवांची जाणीव असल्याशिवाय प्रगतीला प्रेरणा मिळत नाही . आखिल भारतीय स्वकुळ साळी समाज संस्था ही राष्ट्रीय पातळीवर स्थापन होऊन १०५ वर्षे झालेली आहेत . प्रदिर्घ कालखंडात आपल्या साळी समाजाच्या इतिहास लेखनाचे काम झाले नाही याची खंत त्यांनी बोलून दाखविली . व या सत्याचा स्विकार केल्याशिवाय आपल्याला पुढे जाता येणार नाही असे मत त्यांनी व्यक्त केले . नरेंद्र मारवाडे व लक्ष्मण लोणकर यांनी आपल्या साळी समाजाचा इतिहास साध्या , सरळ व सोप्या भाषेत लिहिल्याचे त्यांनी सांगितले . या दोघांनी जे इतिहास लेखनाचे काम केले त्याची दखल संपूर्ण साळी समाजाने घ्यायला हवी होती ती घेतली नाही . याला समाजाचे नेत्रुत्व कारणीभूत असल्याचे त्यांनी नमूद केले . समाजाच्या नेत्रुत्वाला इतिहासाच महत्व माहीत नसावं नरेंद्र मारवाडे व ल.रा.लोणकर यांनी अनेक वर्षे परीश्रम घेऊन आपल्या समाजाचा जो संगतवार उद्बोदक इतिहास लिहिला आहे त्याबद्दल त्यांचा गोरव करणं , त्यांच्या पाठीवर थाप मारणं हे समाज नेत्रुत्वाचं काम होत कर्तव्य होतं , जबाबदारी होती . साळी समाजाचा इतिहास लिहायचा असेल तर सर्वांनी अत्यंत प्रामाणिकपणानं , कष्टाने काम करण्याची आवश्यकता आहे .आता आपल्याला जो समग्र इतिहास लिहावयाचा आहे ते आपल्याला पुढील मुद्दे विचारात घेऊन करावयाचे असल्याचे त्यांनी सांगितले . ते खालील प्रमाणे .

१. साळी समाजाची उत्पत्ती कधी झाली?

याबाबत प्रा . ठोके यांनी असे निदर्शनास आणून दिले की आपल्याकडील कांहीं इतिहास कारांचे मत असे आहे की ऋग्वेदातील काळामध्ये साळी समाजाची उत्पत्ती झाली . ऋग्वेद हा प्रथम वेद होय. याची रचना साधारणपणे इ. स. पू. १५०० च्या सुमारास झाली आहे, म्हणजे ऋग्वेद हा ३५०० वर्षांइतका प्राचीन आहे. म्हणजेच साळी समाजाला ३५००वर्षांचा इतिहास आहे!या ऋग्वेदाच्या रचनेपासून साळी समाजाची सुरुवात होते असे काही अभ्यासकांचे मत आहे . परंतु काही इतिहासकारांच्या मते कोणत्याही संस्कृत ग्रंथामध्ये साळी समाजाचा उल्लेख केलेला नाही . साळी समाजाचा इतिहास हा सातवाहन घराण्यापासून सूरु होतो .सातवाहन हे घराण साधारण ढोबळ मानाने सांगावयाचे झाल्यास इ.स. २००० वर्षापूर्वी होउन गेलेले आहे .या घराण्यातील १७ वा राजा हाल हा होऊन गेला. त्याची कारकीर्द फक्त ४ वर्षाची झाली आहे .त्याने प्राकृत भाषेत 'गाथा सप्तशती' हा ग्रंथ लिहिला आहे . त्याने ग्रंथामध्ये साळी कवी हरिवृध्दा व नंदीवृध्दा यांच्या काव्याचा समावेश केला आहे . प्रा . ठोके म्हणाले की त्यांचेही हेच मत आहे की साळी समाजाची सुरुवात सातवाहन घराण्यापासून सूरु होतो . म्हणजे २००० वर्षापासून साळी समाजाचा इतिहास सुरु होतो .अर्थात इतिहास लिहिताना प्रत्येकाची मते वेगवेगळी असू शकतात . प्रत्येकाने वेगवेगळे संशोधन केलेल असतं . अनेकांनी अनेक ग्रंथ वाचलेले असतात . कळत न कळत काही ग्रंथांवर आपल प्रेम असत . त्या ग्रंथामध्ये लिहिलेले खरे आहे असे आपल्याला वाटते .आणि म्हणून आपल्यातही निरनिराळी मते असू शकतात . निरनिराळी मते असली पाहिजेत परंतू आपल्याला साळी समाजाचा इतिहास कधी सुरु झाला या संबंधीचा निर्णय मोठ्या संयमाने ,कोणत्याही प्रकारचे अभिनिवेश मनामध्ये न धरता हे काम आपल्याला करावयाचे आहे .

२. साळी हे नाव कधी व का पडले?

साळी हे नाव कधी व का पडले ? या बाबतीत देखील आपल्या कडील इतिहासकारामध्ये निरनिराळे विचार प्रवाह आहेत . याबाबत देखील आपल्याला निरनिराळ्या ग्रंथांचा अभ्यास करून योग्य तो निर्णय घ्यावा लागेल .

३. भगवान श्री जिव्हेश्वरांचा जन्म कसा व कधी झाला?

भगवान श्री जिव्हेश्वरांचा जन्म कसा व कधी झाला?

हाही आपल्याकडे मोठा मतभेदाचा मुद्दा आहे . जिव्हेश्वरांचा जन्म भगवान शंकराच्या जिव्हेपासून झाला असे काही जाणकारांचे मत आहे . तर काही लोकांच्या मते हा जन्म जिव्हेपासून झालेला नाही . याबाबत देखील आपल्याला अनेक ग्रंथांचा अभ्यास करुन योग्य तो निर्णय घ्यावा लागेल .

४. भगवान श्री जिव्हेश्वरांचे नांव श्री जिव्हेश्वर की भगवान जिवाजी की जिव्हाजी?

भगवान श्री जिव्हेश्वरांचे नांव श्री जिव्हेश्वर की भगवान जिवाजी की जिव्हाजी आहे याबद्दल आपल्याकडे वेगवेगळे मतप्रवाह आहेत . आखिल भारतीय स्वकुळ साळी संस्थेची स्थापना होऊन १०५ वर्षाचा कालावधी लोटून गेला आहे तरी अद्याप आपल्या देवाचे नेमके नांव काय आहे हे अद्याप नक्की करता आला नाही . आपल्या देवाचे नेमके नांव काय आहे हे काम आपल्याला करावयाचे आहे . हे काम किचकट आहे तरीही ते आपल्यास तडीस न्यावयाचे आहे .

५. साळी मूळचे पैठणचे की काशीचे?

साळी मूळचे पैठणचे की काशीचे ? या संबंधी देखील वाद आहे . नरेंद्र मारवाडे यांनी त्यांच्या ग्रंथात साळी हे मूळचे पैठण येथील असल्याचे म्हटले आहे . याला ब-याच लोकांचा विरोध आहे . त्यांच्या मते साळी हे मूळचे काशीचे आहेत . तरी याबाबत सुध्दा नीटपणे विचार करावा लागणार आहे .

६. स्वकुळ शब्द कधी आला आणि या शब्दाचे महत्त्व काय?

स्वकुळ / साळी शब्द कधी आला या बाबतीत अनेक इतिहासकारामध्ये भिन्न भिन्न मतप्रवाह आहे . याबद्दल देखील आपल्याला योग्य तो निर्णय घ्यावा लागेल .

७. माता अंकिनी-दशांकिनी यांचा शोध आणि बोध?

माता अंकिनी-दशांकिनी यांच्या बाबतीत देखील समाज बांधवांच्या मध्ये मतभेद आहेत . याबद्दलही गंभीरपणे विचार विनिमय करून योग्य तो निर्णय घ्यावा लागेल .

ही प्रस्तावना पुढे नेत प्रा . ठोके यांनी सांगितले की तीन खंडात साळी समाजाचा समग्र इतिहास लिहिला जाणे अत्यंत आवश्यक आहे.

१. साळी समाजाचा प्राचीन इतिहास

२. साळी समाजाचा मध्ययुगीन इतिहास

३. साळी समाजाचा आधुनिक इतिहास

वरील तीनही खंडाच्या इतिहास लेखन , त्याचा कालावधी , सदर खंडाच्या लेखनाचे कामकाज कोणी स्विकारली आहे त्याची सविस्तरपणे माहिती त्यांनी सभेला दिली . ते येणे प्रमाणे :-

विभाग पहिला :- साळी समाजाचा प्राचीन इतिहासप्रा. डॉ. उमाकांत मेन, अकोला.श्री. ल. रा. लोणकर, पुणे.श्री जगन्नाथ एलगट, नाशिक.श्री. आदिनाथ हरवंदे, ठाणे.सौ. आशा मुसळे, पुणे

विभाग दुसरा :- साळी समाजाचा मध्ययुगीन इतिहास :-

१) श्री. डी. जी. निमकर, ठाणे. २) श्री. अंबरनाथ ढगे पुणे. ३) श्री. गोविंद गोतमारे, अमरावती.४) सौ. शुभांगी पाटणकर, अमरावती.५) श्री. अविनाश इंगळे, अकोला.

मध्ययुगीन इतिहास लिहिण्याची मुख्य जबाबदारी श्री डी . जी . निमकर , मुख्य अँडमिन , साळी समाज इतिहास व संस्कृती संशोधन व साळी समाज जिल्हा इतिहास संशोधन ग्रुप , यांच्याकडे सोपविण्यात आली आहे . श्री निमकरांच्या समाज कार्याचा प्रा. ठोकेंनी विशेष उल्लेख केला . श्री निमकर यांच्या अंतकरणात समाज सेवा भिणलेली आहे . समाजाचे ऋण आपल्यावर आहे आणि ते फेडले पाहिजे अशा विचाराचे ते आहेत . समाज इतिहास लेखनाला त्यांचीच प्रेरणा लाभलेली आहे असा उल्लेख त्यांनी केला . श्री लोणकर अनेक वर्षांपासून साळी समाजाचा इतिहास जमा / जमविण्याचे काम करतात . त्यांच्याही कामाचे कौतुक व गौरव प्रा . ठोके यांनी केला .

विभाग तिसरा :- साळी समाजाचा आधुनिक इतिहास :- १) प्रा. मो नि. ठोके अतीत, सातारा २) प्रा सुभाष अढाव, (पारोळा) जळगाव ३) डॉ. आंबादास बर्वे, नाशिक. ४) श्री. विजय ठोंबरे, सोलापूर. ५) सौ. विजया एकबोटे, तेलंगणा.

साळी समाजाचा आधुनिक इतिहास :-
या तिसऱ्या विभागाचा इतिहास लिहिण्याकरता प्रत्येक जिल्ह्याचा गत १०० ते १२५ वर्षांचा इतिहास लिहावा लागणार आहे. म्हणून एकतीस जिल्ह्यातील इतिहास विषयाची आवड असणाऱ्या तसेच क्षमता असणाऱ्या व्यक्तींशी संपर्क साधण्यात आलेला आहे. ७६ व्यक्तींनी आपापल्या जिल्ह्याचा इतिहास लिहिण्याची जबाबदारी घेतलेली आहे. याकरता व्हॉट्सअपवर जिल्हा अभ्यासकांचा स्वतंत्र ग्रुप सुरू करण्यात आलेला आहे.
जिल्हानिहाय व्यक्ती पुढील प्रमाणे:-
१) सातारा जिल्हा :- १) श्री. सुरेश पांढरपट्टे, सातारा. २) श्री. पांडुरंग बिचकर, सातारा. ३) श्री. जे एन कांबळे, कराड.

२) कोल्हापूर जिल्हा :- १) श्री. वसंतराव काजवे, कोल्हापूर. २) ॲड. एस. व्ही. सावेकर, इचलकरंजी. ३) श्री. जी बी बोरसे, कोल्हापूर. ४) श्री. आनंद बावणे, इचलकरंजी.

३) सांगली जिल्हा :- १) श्री. प्रकाश भंडारे, इस्लामपूर. २) श्री. पी बी दुर्गुळे, नेर्ले. ३) श्री. पांडुरंग भंडारे, मिरज.

४) पुणे जिल्हा :-
वरीलप्रमाणे इतिहास लेखन करताना समाजातील देश स्तरावरील , राज्य /जिल्हा स्तरावरील वा अन्य समाज सेवक , आदर्श समाज संस्था , कर्तबगार व्यक्ती , आदींच्या कामाची दखल घ्यावी लागेल असेही त्यांनी नमूद केले . इतिहास लेखनाचे काम जरी महाकठीण असले तरी ते पेलण्याइतपत सक्षम लेखक आपल्या ग्रुप मध्ये , समाजात आहेत याचा उल्लेख त्यांनी आवर्जून केला . भगवान श्री जिव्हेश्वर जन्माबाबत प्रा . ठोके यांनी दिलेल्या माहिती वरील श्री हावरे यांनी विचारलेल्या प्रश्नाला श्री ठोके यांनी समर्पक उत्तर देउन शंका निरसन केली . तसेच इतरही संबंधित बाबींचा उहापोह करुन प्रस्तावना संपविली .

सदर विषयावर ग्रुपवरील सभासदांची मते
**सुभाष आढाव , सूत्रसंचालक**
वरीलप्रमाणे प्रस्तावना झाल्यानंतर प्रा . श्री सुभाष आढाव , सूत्रसंचालक यांनी सभेस सांगितले की ही सभा अत्यंत महत्वपुर्ण व ऐतिहासिक प्रथम सभा असून आपण साळी समाजाच्या इतिहासाचा , MILE STONE , पथदर्शी , समाजाच्या विकास दर्शविणारा महत्वाचा टप्पा आपण सुरु करीत आहोत . हे काम पूर्ण होण्यास किती काळ लागेल हे आज सांगता

येत नाही . ग्रुपवरील प्रत्येक सन्माननीय सभासद महत्वाचा आहे . प्रत्येकाला बोलावयाचे आहे .म्हणून प्रत्येकाने थोडक्यात , मुद्देसुद आपले विचार , मत मांडावे . आता उपस्थित असलेल्या प्रत्येक सभासदांनी प्रथम आपले नांव , गांव सांगून , साळी समाज इतिहास लेखनासंबंधी , विषयावर आपले विचार , मते मांडावीत .

**गोविंदराव गोतमारे , अमरावती**
मला या ठिकाणी सर्वांना असे सागावयाचे आहे की आपण इतिहास संशोधनाचे कार्य सुरु करत आहोत . ही सुरुवात आहे . कोणताही निष्कर्ष नाही . लगेचच अंतिम निर्णय घेत नाही आहोत . तरी आता जी चर्चा करीत आहोत , जी माहिती सांगत आहोत ती अंतिम आहे असे समजू नये .कांही अशी तत्वे , प्रसंग आहेत की त्यावर अद्याप निर्णय होर नाहीत उदा. कानिफनाथ गोरखनाथ इ . आपल्या समाजाचा इतिहास लिहिताना आधुनिक इतिहास लिहिण्यावर जास्त भर द्यावा , आणि जिल्हानिहाय इतिहास लिहावा .

**वैभव ढोरजे :--**
इतिहास हा तीन खंडात अनेक वर्षांनंतर लिहीत आहोत . यापुढे दरवर्षी समाजातील घटना लिहून त्याची साठवणूक करावी . सद्या आपण भारतभर एक उपक्रम राबवतो . त्याच नांव आहे भगवान श्री जिव्हेश्वर आणि साळी समाज एक वैश्विक परिचय . या माध्यमातून आम्ही एक लिखाण केले आहे . या कामात दादांनी व येलगट सरांनी मदत केलेली आहे .दि . २१ ,२२,२३ रोजी आपण आपापल्या घरी भगवान श्री जिव्हेश्वरांचे पूजन करावयाचे व आपल्या शेजारी तसेच साळी समाजाव्यतिरीक्त जवळच्या इतर ८ ते १० लोकांना पूजेला बोलावून साळी समाज व भगवान श्री जिव्हेश्वर यांच्या बद्दल माहिती सांगावयाची . त्यामुळे आपण आपल्या समाजाचे स्थान प्रकट / निर्माण करु शकू . औरंगाबाद येथील डॉ . बदशिरे यांनी साळी समाज या विषयावर PHD प्राप्त केली आहे . समाजाचा इतिहास मला मिळाला आहे तो मी मंडळाच्या स्वाधीन करीन .

**श्रीमती ललित महातेकर**
तीन खंडात क्रमवार लिखाण करताना एका खंडाचे लिखाण पूर्ण केल्याशिवाय दुसर्या खंडाला हात लावायचा नाही असे न करता जे साहित्य हाती लागेल ते लिहावयाचे व त्याचे वर्गीकरण नंतर करावे .त्यांच्याकडे महातेकर कुटुंबीयांनी लिहीलेला मोडी लिपीतील समाज इतिहास उपलब्ध असल्याचे त्यांनी सांगितले . त्यांच्या मनातील काही शंका त्यांनी उपस्थित केल्या त्या शंकांचे श्री आढाव ,कापसे ,निमकर यांनी निरसन केले .

**श्री चिंचकर सदाशिव**
श्री श्री श्री सदगुरु नरसिंह अवधूत स्वामी महाराजांचे चरीत्र पुस्तक लिहिल्याबद्दल माहिती सभेला दिली . व स्वकुळ साळी समाज नारायण पेठकर , पुणे संस्थेच्या इतिहास लेखनाबाबत माहिती दिली .

**श्री जगन्नाथ येलगट**
पुणे येथे १९७७ साली झालेल्या आखिल भारतीय स्वकूळ साळी समाज अधिवेशनाचे वेळी सर्व पोटजाती स्वकूळ साळी समाजात विलीन करावयाच्या व एकच स्वकूळ साळी समाज म्हणावयाचे आहे तर श्री चिंचकर म्हणाले की मी स्व.सा.नारायण पेठकर संस्थेचा इतिहास जमा करतो .तर असा वेगवेगळा इतिहास जमा करायचा का ? लिहायचा का ? पोटजातींचा इतिहास लिहित गेलो तर पोटजाती विलीन कधी होयार हा प्रश्न आहे .४ थ्या महाअधिवेशनावेळी नगर जिल्ह्यातील किर्तनकार श्री सांगळे यांनी ख्रिश्चन धर्म स्विकारल्याबाबात व त्यांना समाजाने वाळीत टाकल्याचे झालेल्या चर्चेचा उल्लेख करुन आपण सर्व समाजाने एकत्र कधी व्हायच असा प्रश्न उपस्थित केला . यावर श्रीमती महातेकर व श्री चिंचकर यांनी देखील चर्चा केली . सद्या देखील आपल्या समाजातील मुले इतर धर्मातील , समाजातील मुलींशी लग्न करतात त्या मुलींना समाजात स्विकारण्याबाबत चर्चा केली . त्यावर भविष्यात क्षआणखी सखोल चर्चा होण्याची गरज असल्याचे श्री निमकर यांनी नमूद केले .

**श्री मिलिंद पाटणकर , अमरावती**

के . पाटणकर यांनी लिहिलेल्या आरतींचा अल्बम केला होता . प्रस्थापितांमध्ये होणार्या धर्मांतराचा अभ्यास स्वतंत्रपणे करावा .आर्य संस्क्रुती पूर्वी सिंधवी संस्कृती होती .सिधवी संस्कृती मध्ये दोन महत्वाचे मुद्दे आहेत . त्यांतील एक मुद्दा म्हणजे त्यांना वस्त्र विणण्याची कला अवगत होती . इतिहास संशोधनाला काल मर्यादा नाही . संशोधन अविरत चालणारी बाब आहे .आपल्याला ज्या गोष्टी मिळाल्या त्याचे एकत्रिकरण करावे . व त्याची सुसंगत मांडणी करावी . तीन भागातील इतिहास लेखन योग्य आहे .प्राचीन इतिहास लिहिताना वस्तुस्थिती मांडणे गरजेचे आहे .परंतु प्राचीन इतिहास मांडतांना प्रस्थापित जी माहिती आहे ज्या नोंदी आहेत त्या मान्य कराव्यात .आम्ही अनेक ठिकाणी आहोत हे नमूद करावे .वादात्मक मुद्दे उपस्थित करु नयेत .

**श्री रमेश चिल्लाळ**

श्री सदाशिव चिंचकर यांनी श्री श्री श्री सदगुरु नरसिंह अवधूत स्वामी महाराजांचे चरीत्र पुस्तक लिहिल्याबद्दल माहिती सभेला दिली . त्याबद्दल माझ्याकडे देखील कन्नड भाषेत माहिती आलेली आहे ती मी हिंदी मध्ये ट्रान्सलेट करुन पाठवित आहे . इ.स.२०१६ मध्ये हूबळी येथे जी आखिल भारतीय स्वकुळ साळी महापरिषद झाली त्यात भगवान श्री जिव्हेश्वरांचा जन्म नक्की कोठे झाला ; श्रीक्षेत्र उत्तर काशी येथे झाला आणि ते तेथे कालभैरव येथे स्थित झाले याबाबत कोठेही उल्लेख आलेला नाही . तरी याबाबत माहिती घेण्याबाबतचा ठराव मंजूर करण्यात आला . श्री जिव्हेश्वरांचा जन्म नक्की कोठे झाला ते ठिकाण हे निश्चित करण्यासाठी जास्त प्रयत्न करण्याची आवश्यकता असल्याचे त्यांनी प्रतिपादन केले . कर्नाटक मध्ये ११ संत झालेले आहेत त्यांची माहिती कन्नड भाषेत प्राप्त झाली असून ती हिंदी भाषेत रुपांतरीत करण्यास सांगितले आहे . आळंदी येथील मिटिंगमध्ये सादर करीत आहे , किंवा पाठवून देईल .

श्री जिव्हेश्वर जन्माबाबतच्या विषयांवर पुढे जाऊन म्हणाले की अलाहाबादचे श्री अंगद मिश्रा नावाचे ग्रहस्थ त्यांच्या परिचयाचे असून मूळस्तंभ ग्रंथातील माहिती मिळवून देण्याची त्यांनी तयारी दर्शविली . त्यानंतर "अथ मूळ स्तंभ साळी महात्म्य " या ग्रंथाची झेरॉक्स प्रत त्याच्याकडे असल्याचे श्री मिलिंद पाटणकर यांनी सांगितले . व त्यातील श्री जिव्हेश्वरांबाबतची माहिती ग्रुपवर देण्याचे मान्य केले .

**श्री दिलीप घट्टे**

जी प्रचलित पध्दत चालू आहे ती चालू ठेवावी . सर्व साळी एकच असल्याचा ठराव पुण्यातील महाअधिवेशनावेळी झालेला आहे .भगवान श्री जिव्हेश्वर जन्मोत्सव सुर्योदय वेळी असून ती सर्वत्र पाळली जावी या बद्दल आग्रह केला . आखिल भारतीय स्व. साळी संस्थेने या बाबतचा निर्णय सर्व समाज संस्थांना लेखी स्वरुपात पाठविल्याचे श्री चिलाळ यानी विदीत केले .कालनिर्णय व इतर कॅलेंडर्स मध्ये श्री जिव्हेश्वर जन्माबाबत श्रावण शुध्द त्रयोदशीला उल्लेख करण्यासाठी प्रयत्न करण्याबाबत श्री पाटणकर यांनी सूचना केली .

**श्री अरविंद धावणे**

आपल्या समाजातील लोकांच्या नोंदी औंढा नागनाथ येथील एक व्यक्ती करत असते त्याच्याकडून समाजिची माहिती घ्यावी .

## *साळी समाज इतिहास आणि संस्कृती संशोधन मंडळाची वाटचाल :-

आपल्या साळी समाजाचा समग्र इतिहास लिहिणे अत्यंत गरजेचे असल्याने साधारणतः तीन महिन्यांपूर्वी प्रस्तुत लेखक; श्री. ल. रा. लोणकर, पुणे आणि श्री. डी. जी. निमकर, ठाणे यांनी भ्रमणध्वनीद्वारा परस्पर चर्चा केली. या चर्चेत आपल्या समाजाचा समग्र इतिहास लिहिणे अत्यंत आवश्यक यासंबंधी उस्फूर्तपणे एकमत झाले.

आजची तरुण पिढी भ्रमणध्वनी, दूरदर्शन आणि लॅपटॉपच्या युगात समाजाच्या परंपरा व इतिहास यापासून फार दूर जात आहे. वाचन संस्कृतीपासून दूर गेली आहे, हे सुसंस्काराच्या त्यादृष्टीने घातक आहे., म्हणून आपल्या समाजाचा 2000-2500 वर्षांचा गत इतिहास प्रयत्नपूर्वक लिहिणे अत्यंत गरजेचे आहे. या पार्श्वभूमीवर प्रस्तुत लेखकाने अखिल भारतीय स्वकुळ साळी समाज (विणकर) संस्थेचे अध्यक्ष मा. श्री. रमेश चिल्लाळ (हुबळी ) यांच्याशी भ्रमणध्वनीद्वारा चर्चा केली. या चर्चेत अखिल भारतीय स्वकुळ साळी समाज (विणकर) संस्थेच्या नेतृत्वाखाली हा इतिहास लिहिण्याचे कार्य करावे असे ठरले. मा. अध्यक्षांनी समाजातील 55 इतिहास अभ्यासकांना पत्रे पाठवून दि. 21 मार्च 2021 रोजी आळंदी येथील स्वकुळ साळी ज्ञातिगृहात चर्चासत्र आयोजित केले. परंतु कोरोच्या वाढत्या प्रादुर्भावामुळे हे चर्चासत्र रद्द करावे लागले. कोरोनामुळे आपला वेळ वाया जाऊ नये म्हणून व्हॉट्सअपवर आपण *साळी समाज इतिहास आणि संस्कृती संशोधन* ग्रुप सुरू करू या आणि व्हॉट्सअप संवाद करू या असे श्री. डी. जी. निमकर, श्री. ल. रा. लोणकर आणि प्रस्तुत लेखक यांच्यात ठरले. श्री. निमकर हे डमिन झाले. त्यानुसार हा ग्रुप गत तीन महिन्यांपासून कार्यरत आहे. विशेष हे की समाजातील इतिहास अभ्यासकांनी उस्फूर्त प्रतिसाद दिला आणि या ग्रुप वर सध्या 62अभ्यासक आहेत.

जिल्हा अभ्यासकांचा स्वतंत्र ग्रुप तयार झाला असून या ग्रुपवर 31 जिल्ह्यातील 76 अभ्यासक आहेत. आपल्या समाजाचा लिहिण्याच्या विचाराला चांगला प्रतिसाद मिळाला म्हणून अ. भा. स्व. साळी समाज (विणकर) संस्थेचे अध्यक्ष यांनी आळंदी येथील स्वकुळ साळी ज्ञातिगृहात तारीख 24 जुलै 2021 रोजी चर्चासत्र घेण्याचे निश्चित केले. दुर्दैवाने हे चर्चासत्र कोरोनाच्या वाढत्या प्रादुर्भावामुळे रद्द करावे लागले. आता हे चर्चासत्र 25 – 26 सप्टेंबर 2021 रोजी आळंदीच्या ज्ञातिगृहात घेण्याचा मानस आहे. व्हॉट्सअपद्वारा इतिहास अभ्यासकांच्या झालेल्या चर्चेतून साळी समाजाचा कालक्रमानुसार तीन विभागात समग्र इतिहास लिहिला जावा असे ठरले आहे. या करिता खालील प्रमाणे इतिहास अभ्यासकांनी इतिहास लिहिण्याची जबाबदारी स्वीकारली आहे.

विभाग पहिला :- साळी समाजाचा प्राचीन इतिहास

१) प्रा. डॉ. उमाकांत मेन, अकोला.
२) श्री. ल. रा. लोणकर, पुणे.
३) श्री जगन्नाथ एलगट, नाशिक.
४) श्री. आदिनाथ हरवंदे, ठाणे.
५) सौ. आशा मुसळे, पुणे

विभाग दुसरा :- साळी समाजाचा मध्ययुगीन इतिहास :-

१) श्री. डी. जी. निमकर, ठाणे. २) श्री. अंबरनाथ ढगे पुणे.

३) श्री. गोविंद गोतमारे, अमरावती. ४) सौ. शुभांगी पाटणकर, अमरावती.

५) श्री. अविनाश इंगळे, अकोला.

विभाग तिसरा :- साळी समाजाचा आधुनिक इतिहास :-

१) प्रा. मो नि. ठोके अतीत, सातारा २) प्रा सुभाष अढाव, (पारोळा) जळगाव

३) डॉ. आंबादास बर्वे, नाशिक. ४) श्री. विजय ठोंबरे, सोलापूर.

५) सौ. विजया एकबोटे, तेलंगणा.

साळी समाजाचा आधुनिक इतिहास :-

या तिसऱ्या विभागाचा इतिहास लिहिण्याकरता प्रत्येक जिल्ह्याचा गत १०० ते १२५ वर्षांचा इतिहास लिहावा लागणार आहे. म्हणून एकतीस जिल्ह्यातील इतिहास विषयाची आवड असणाऱ्या तसेच क्षमता असणाऱ्या व्यक्तींशी संपर्क साधण्यात आलेला आहे. ७६ व्यक्तींनी आपापल्या जिल्ह्याचा इतिहास लिहिण्याची जबाबदारी घेतलेली आहे. याकरता व्हॉट्सअपवर जिल्हा अभ्यासकांचा स्वतंत्र ग्रुप सुरू करण्यात आलेला आहे.

जिल्हानिहाय व्यक्ती पुढील प्रमाणे:-

१) *सातारा जिल्हा :-*

१) श्री. सुरेश पांढरपट्टे, सातारा.

२) श्री. पांडुरंग बिचकर, सातारा.

३) श्री. जे एन कांबळे, कराड.

२) *कोल्हापूर जिल्हा :-*

१) श्री. वसंतराव काजवे, कोल्हापूर. २) ॲड. एस. व्ही. सावेकर, इचलकरंजी.

३) श्री. जी बी बोरसे, कोल्हापूर. ४) श्री. आनंद बावणे, इचलकरंजी.

३) *सांगली जिल्हा :-*

१) श्री. प्रकाश भंडारे, इस्लामपूर.

२) श्री. पी बी दुर्गुळे, नेर्ले.

३) श्री. पांडुरंग भंडारे, मिरज.

४) *पुणे जिल्हा :-*

१) श्रीमती ललित महातेकर, पुणे २) श्री. शिवाजीराव एक्के, पुणे.

३) श्री. महादेव कापसे, पुणे.

५) *अकोला जिल्हा :-*

१) डॉ. उमाकांत मेन, अकोला.

२) श्री. अविनाश इंगळे, अकोला.

३) श्री. विलास भागवत, अकोला.

६) *अमरावती जिल्हा :-*

१) श्री. गोविंद गोतमारे, अमरावती.

२) सौ. शुभांगी पाटणकर, अमरावती.

३) श्री. मिलिंद पाटणकर, अमरावती.

७) *अहमदनगर जिल्हा :-*

१) श्री. संजय साळी, अहमदनगर.

२) श्री. गणेश अष्टेकर, अहमदनगर.

८) *औरंगाबाद जिल्हा :-*

१) श्री. वैभव ढोरजे, औरंगाबाद

२) श्री. विलास सरोदे, औरंगाबाद.

३) श्री. अरविंद धावणे, औरंगाबाद.

९) *जालना जिल्हा :-*

१) श्री. कृष्णकांत बदमोरे, जालना.

२) श्री. प्रकाश सरोदे, जालना.

१०) *नासिक जिल्हा :-*

१) श्री. सुरेश सोनवणे, नाशिक.

२) श्री. सुरेश धारणकर, नाशिक.

३) श्री. जगन्नाथ एलगट, नाशिक.

११) *ठाणे जिल्हा :-*

१२) *पालघर जिल्हा :-*

१) श्री. डी जी निमकर, ठाणे.

२) श्री देवेन क्षिरसागर, ठाणे.

३) सौ. गीता हरवंदे, ठाणे.

१३) *जळगाव जिल्हा :-*

१४) *धुळे जिल्हा :-*

१५) *नंदुरबार जिल्हा :-*

१) प्रा. सुभाष अढाव, पारोळा.

२) प्रा. नंदन वडिंकार, यावल.

३) सौ. क्षमा साळी, एरंडोल.

४) श्री. उदय निकुंभ, शहादा.

५) श्री. विश्वजीत क्षिरसागर, शहादा.

६) श्री. राजेंद्र पाटील, भुसावळ.

१६) *परभणी जिल्हा :-*

१) श्री. राजेंद्र वडकर, परभणी

२) श्री. नागनाथ सरोदे, हिंगोली.

३) श्री. अमोल भोपळे, नांदेड.

१७) *बीड जिल्हा :-*

१) श्री. मुकेश शिवगण, बीड.

२) सौ. स्वाती ताटे, बीड.

१८) *लातूर जिल्हा :-*

१९) *उस्मानाबाद जिल्हा :-*

१) श्री. संजय गणेश साळी, लातूर.

२०) *बुलढाणा जिल्हा :-*

१) श्री. नवनाथ गोमधरे, देऊळगावराजा.

२१) * वाशिम जिल्हा :-*

१) श्री. बंडू गाढवे, वाशिम

२२) *यवतमाळ जिल्हा :-*

१) श्री. अभय डोईफोडे, यवतमाळ.

२३) *भंडारा जिल्हा :-*

१) डॉ. भूमकर, गोंदिया

२४) *नागपूर जिल्हा :-*

१) श्री. देविदास काळाने, नागपूर.

२५) *गोंदिया जिल्हा :-*

१) श्री. दत्तात्रय दिवटे, वर्धा

२६ व २७) *मुंबई व मुंबई उपनगरे :-*

१) श्री. लक्ष्मण सरोदे, मुंबई.

२) श्री. सुभाष कप्पे, मुंबई.

३) श्री. हरीष अष्टेकर, मुंबई.

४) श्री. संजय महादार, मुंबई

२८) *रायगड जिल्हा :-*

१) श्री. चंद्रकांत हावरे, मुंबई.

२) श्री. परशुराम डोईफोडे, मुंबई.

३) श्री. विजय वाउळ, डोंबिवली.

२९) *वर्धा जिल्हा :-*

१) श्री. दत्तात्रय दिवटे,

३०) *चंद्रपूर जिल्हा :-*

१) डॉक्टर गोपालकृष्ण कावलकर, चंद्रपूर.

३१) *सोलापूर जिल्हा :-*

१) श्री. नंदू सपार, सोलापूर

२) श्री. विजय ठोंबरे, माढा.

३) डॉ. चंद्रशेखर टोणपे, सोलापूर.

*जय जिव्हेश्वर! जय माता अंकिनी - दशांकिनी!!*

-मो. नि. ठोके, अतित जि. सातारा.

जयजिव्हेश्वर जयजिव्हेश्वर जयजिव्हेश्वर



स्मृतीपुष्प

# स्वकुळ समाचार आधारस्तंभ

आपल्या दिवंगत प्रिय व्यक्तीच्या नावे रू. १,५०१ आधारस्तंभास देणगी देऊन स्वकुळ समाचारच्या समाज सेवेत सहभागी व्हा.

७६४) कै. विनायक विष्णू दांडेकर, मुलुंड
७६५) कै. बाबुराव आसाराम सरोदे, औरंगाबाद
७६६) कै. सौ. कमलबाई प्रभाकर शेकटकर, शेवगांव
७६७) कै. प्रभाकर बाबुराव आढाव, कल्याण
७६८) कै. सुनंदा एकनाथ पावले, चिपळूण
७६९) कै. विलास रामचंद्र आंबुर्ले, डोंबिवली
७७०) कै. विजयकुमार बाबुराव घटे, अहमदनगर
७७१) कै रामचंद्र विष्णू मर्डेकर, बदलापूर
७७२) कै. भास्कर गुलाब खंडारे, डोंबिवली
७७३) कै. गणपत निळकंठ सरोदे, भिवंडी
७७४) कै. रुक्मिणी गणपत सरोदे, भिवंडी
७७५) कै. शंकरराव गुणाजी साळी, डोंबिवली
७७६) कै. विजय शंकर वगद, ठाणे
७७७) कै. पुष्पलाल दत्तुशेठ क्षीरसागर, शहादा
७७८) कै. पंडित कन्हैयालाल चित्तेवान, धुळे
७७९) कै. भास्करराव सुखलाल बागडे, डोंबिवली
७८०) कै. सौ. अनुजा अरुण बागडे, डोंबिवली
७८१) कै. राहुल नंदकिशोर धरम (साळी), इंदौर
७८२) कै. किसनराव रघुनाथ पोकळे, अहमदनगर
७८३) कै. त्र्यंबकराव रामचंद्र येखे, अहमदनगर
७८४) कै. सौ. जयश्री दत्तात्रय मते, पुणे
७८५) कै. सुमनबाई लक्ष्मण धरम (साळी), एरंडोल
७८६) कै. सौ. शकुंतला एकनाथ पंडीत, नाशिक
७८७) कै. सौ. मनिषा मनोहर गोंधळेकर, चिपळूण
७८८) कै. सौ. शैला गोरखनाथ घोगे, बदलापूर
७८९) कै.सौ.शकुंतला माधवराव बंबाळे, चांदवड
७९०) कै. काशिनाथ रघुनाथ सातपुते, ठाणे
७९१) कै. श्रीमती शांताबाई माधवराव दिवटे, सुरत
७९२) कै. शंकरराव नारायण वांद्रे, पुणे
७९३) कै. मच्छिंद्रनाथ सिताराम साळी, पुणे
७९४) कै. सौ. पुष्पा सुरेश अष्टेकर, अहमदनगर
७९५) कै. सौ. वसुधा शशिकांत गोंधळेकर, डोंबिवली
७९६) स्वा. सै. कै. एकनाथराव गो. मांजरे, वैजापूर
७९७) कै. मनोहर बाबा गोंधळेकर, चिपळूण
७९८) कै. गोपाळराव झिपरु लांडगे, डोंबिवली
७९९) कै. श्रीमती मनोरमा गोपाळ लांडगे, डोंबिवली
८००) कै. श्रीमती शकुंतला पु. दिवाणे, उल्हासनगर
८०१) कै. बालाजी लक्ष्मण ढवण, भिवंडी
८०२) कै. श्रीमती विमलबाई खेमचंद साळी, शहादा
८०३) कै. श्रीमती सावित्रीबाई नरहर पुरे, नाशिकरोड
८०४) कै. किसन त्र्यंबक ढवण, विंचूर
८०५) कै. रुख्मिणीबाई किसनराव ढवण, विंचूर
८०६) कै. पुरुषोत्तम श्रावण वाव्हळ, पुणे
८०७) कै. श्रीमती राधाबाई काशिनाथ साळी, खंडवा
८०८) कै. सौ. अंजना रामचंद्र घोले, ठाकुर्ली(डोंबिवली)
८०९) कै. काशिनाथ बळवंत डांगरे, इचलकरंजी
८१०) कै. कोंडाबाई काशिनाथ डांगरे, इचलकरंजी
८११) कै. गणपत बळवंत डांगरे, इचलकरंजी
८१२) कै. अनुसया गणपत डांगरे, इचलकरंजी
८१३) कै. गोपीनाथ दत्तात्रय ढवण, विंचूर
८१४) कै. लक्ष्मण सहदेव सरोदे, नाशिक
८१५) कै. श्रीमती शकुंतला या. कासटकर,उल्हासनगर
८१६) कै. वसंतराव मुरलीधर अष्टेकर, मुंबई
८१७) कै. तानीरामशेठ हिरामणशेठ बडकस, कुरंगीकर
८१८) कै. गं. भा. सोनाबाई ता. बडकस,कुरंगीकर
८१९) कै. हिरामणशेठ सखारामशेठ कापरे, एरंडोल
८२०) कै. आवडाबाई हिरमणशेठ कापरे, एरंडोल
८२१) कै. नारायणराव वंजीलाल बाळदे, सिन्नर
८२२) कै. गं. भा. राधाबाई ना. बाळदे, सिन्नर
८२३) कै. विठ्ठलशेठ हिरामणशेठ कापरे, एरंडोल
८२४) कै. सौ. वारुबाई विठ्ठलशेठ कापरे, एरंडोल
८२५) कै. सौ. मीरा बारसु सिताफळे, डोंबिवली
८२६) कै. हणमंतराव शंकरराव महादार, रत्नागिरी
८२७) कै. वसंतराव रघुनाथ साळी (सातपुते), कळवा
८२८) कै. मनोरमा रघुनाथ पाटणकर, डोंबिवली
८२९) कै. रमेश गणपत खेडकर, डोंबिवली
८३०) कै. अवंतिका ज. खडमकर, नाशिक
८३१) कै. सदाशिव अनंत जंत्रे, अंधेरी, मुंबई
८३२) कै. कु. छाया सदाशिव जंत्रे, अंधेरी, मुंबई
८३३) कै. सोनू खंडू वाझट, सुरत
८३४) कै. मथुराबाई बाबूराव झडप, विंचूर, नाशिक
८३५) कै. मधुकर भिकू सागावकर, पेठमाप, चिपळूण
८३६) कै. सुरेश माधवराव साळी, नेरुळ, नवीमुंबई
८३७) कै. श्रीकृष्ण नथू साळी (सर), पवई, मुंबई
८३८) कै. सौ. सुनिता प्रकाश भागवत, बदलापूर
८३९) कै. सुकलाल बाजीराव थोरात (साळी)अंबरनाथ
८४०) कै. सौ. गंगूबाई सुकलाल थोरात (साळी)अंबरनाथ
८४१) कै. प्रदीप मधुकर कांबळे, कळवा, ठाणे
८४२) कै. सौ. विजया सुरेश कासटकर, मनमाड

## स्वकुळ साळी समाजसेवा मंडळ, सांगली, स्वकुळ समाचार व साळी समाचार या समाज मासिकाचे जाहीर आभार

स्वकुळ साळी समाजसेवा मंडळाच्या अध्यक्षांनी सांगली येथे उभारलेल्या श्री जिव्हेश्र्वर भवनाची यशोगाथा कोरोना महामारीचे सावट, लॉक डाऊन असलेमुळे उद्घाटनाचा कार्यक्रम घेता येत नसल्यामुळे सविस्तर असा लेख तयार केला. त्या लेखात समाजबांधवांमध्ये असलेली जिद्द, असलेला प्रामाणिकपणा, कष्टाळू वृत्ती, दुसऱ्याच आहे त्याच श्रेय त्यालाच देण्याचा सच्चेपणा, समाजात चांगल्या वृत्तीला प्रोत्साहन देण्याचा दिलदारपणा, शून्यातून सामाजिक मोठे काम करण्याची पद्धत यावर एक लेख लिहिला होता.

त्या लेखास ठाणे येथून प्रसिद्ध होणाऱ्या स्वकुळ समाचार व इचलकरंजी येथून प्रसिद्ध होणाऱ्या साळी समाचार या दोन मासिकानी जवळ जवळ जसा लेख लिहिला होता, तसाच प्रसिद्ध केला.त्याबद्दल त्यांचे जाहीर आभार मानण्यात मंडळास अत्यानंद होत आहे.

प्रा.दिनकर डहाके, अध्यक्ष, स्वकुळ साळी समाज सेवा मंडळ, सांगली, समस्त कार्यकारिणी सदस्य व सर्व समाज बांधव, सांगली.

कै. सौ. शर्मिला हिच्या स्मरणार्थ श्री. व सौ. शामला सुरेश हरवंदे (महाड) यांच्या सौजन्याने पृष्ठदान



कै. श्री. करिअप्पा बुध्दिवंतअप्पा गच्ची व कै. श्रीमती गंगम्मा करिअप्पा गच्ची, गदग-बेटगेरी (कर्नाटक) यांच्या स्मरणार्थ डॉ. गोपाळकृष्ण करिअप्पा गच्ची, डोंबिवली यांच्या सौजन्याने पृष्ठदान.

# भावपूर्ण श्रध्दांजली



१) बदलापुर येथील समाज बांधव श्री. प्रशांत पाटणकर यांचे पिताश्री **श्री.बजरंग किसन पाटणकर वय ७७**, यांचे आज दि. १५/८/२०२१ रोजी अकस्मात निधन झाले.



२) संगमनेर - **श्री. गुलाबराव मुरलीधर वाडेकर, वय ८५ वर्ष** यांचे रविवार दि. १५ ऑगस्ट २०२१ रोजी निधन झाले.

३) बदलापुर - येथील समाज बांधव श्री अशोक व कै. सुधाकरराव कढेकर यांचे बंधु **श्री. दिलीप माधवराव कढेकर** यांचे दिर्घ आजाराने आज दि. १६/८/२०२१ रोजी निधन झाले.

४) पारोळा - येथील समाज बांधव **श्री. प्रभाकर पंढरीनाथ मुंदानकर** यांचे दि.17-08-2021 रोजी अल्पशा आजाराने निधन झाले.

५) अंबरनाथ - **श्री.विनायक सखाराम कुराडे, वय वर्ष ७२** , यांचे आज दि. 23/08/2021 रोजी पहाटे २-१५ मी. निधन झाले. ते संदीप महादेव वैद्य यांचे मामा आहेत.



६) नाशिक,सिन्नर - येथील भगिनी **श्रीमती सुभाद्राबाई दत्तात्रय दिंडे,** यांचे दि.18/08/2021रोजी वृद्धापकाळाने निधन झाले



७) सुरत,पर्वत गाम - येथील समाजबांधव श्री.नामदेव बाजीराव भागवत यांची धर्मपत्नी **सौ.दुर्गाबाई नामदेव भागवत** यांचे दि.२४/०८/२०२१ रोजी निधन झाले.

८) सुरत, लिंबायत - येथील समाजबांधव श्री.अरविंद व श्री.नितीन यांचे वडील **श्री.रमेश बाबुराव लश्करे** यांचे दि.29/08/2021 रोजी निधन झाले.

या सर्व ज्ञात-अज्ञात दिवंगतांना ठाणे जिल्हा स्वकुळ साळी समाज व स्वकुळ समाचार परिवारातर्फे भावपूर्ण श्रध्दांजली!!

कै. (सौ.) शुभलक्ष्मी नारायणराव कांबळे यांचे स्मरणार्थ, ठाणे येथील श्री. अमित नारायणराव कांबळे यांच्या सौजन्याने पृष्ठदान.

कै. सौ. कृष्णाबाई वि. कांबळे यांचे स्मरणार्थ सौ. मंगलाबाई दिनकरराव कांबळे (सून) यांचेकडून पृष्ठदान




कै. श्री. सखाराम बळवंत बेलेकर व कै. सौ. लक्ष्मीबाई सखाराम बेलेकर, इचलकरंजी यांच्या स्मरणार्थ श्री. सुभाष सखाराम बेलेकर याचे कडून पृष्ठदान.

कै. तुकाराम लक्ष्मण घोंगे व कै. सुशिला तुकाराम घोंगे, बोरीवली तसेच कै. सिताराम लक्ष्मण घोंगे व कै. सौ. इंदिरा सिताराम घोंगे (लोअरपरेल) यांच्या स्मरणार्थ पृष्ठदान.

Swakul Samachar published and posted on 2nd date of every month at BPC Kalyan

Postel Reg. No. THC/144/2020-2022

WPP License No. NMR/Tech/WPP-02/TC/2021 (Upto Dec.)





# प्रथम पुण्यस्मरण

वाटले नव्हते कोणालाही असे अघटीत घडून जाईल
चालता बोलता देव तुला नेईन.
माणुसकी, स्नेह याची ज्यावेळी चर्चा होईल,
त्यावेळी सर्वात पाहिली आठवण तुझी येईल.

## कै. सौं सुनिता प्रकाश भागवत

## शोकाकुल

श्री प्रकाश लालचंद भागवत
चि चिराग प्रकाश भागवत (मुलगा)
श्री व सौं मिनाक्षी निलेश मते ( मुलगी जावई)
चि कौस्तुभ निलेश मते (नातू)
समस्त भागवत परिवार.

कै. सौं सुनिता प्रकाश भागवत
स्वर्गवास : भाद्रपद शु!! 4 शके 1942
शनिवार दि : 22-08-2020

**स्वकुळ समाचार पृष्ठदानाचे सन्माननीय हितचिंतक**

१) श्रीमती व्दारकाबाई प्रल्हाद साळी, बदलापूर मो. ९८५०५१२७१७
२) श्री. किरण पांडुरंग काटकर, मुलुंड मो. ९८३३२८११५२
३) श्री. समीर शशीकांत अंबुर्ले, विरार मो. ९०९६५९८५६१
४) सौ. महानंदा कमलाकर हर्णौकर, मुलुंड मो. ९९६१२७८५५०

**If undelivered please return to:**

SEPT 2021

**Swakul Samachar**

Editor- Mr. Gopal S. Thorat
Room No.5177, Gharkul Hsg. Soc.,
Near Maruti Temple, Shivaji Nagar,
Ambarnath (East) 421501

या अंकात व्यक्त केलेल्या मताविषयी संपादक सहमत असतातच असे नाही .... संपादक

To,

Printer & Publisher Mr. Barsu R. Sitafale on behalf of Thane Jillah Swakul Sali Samaj Printed at Laxmi Printers, 4. Mohini Soc., Anand Nagar, Dombivli (W) Dist. Thane - 421 202 Published at:B/303, Rutuvrat Co-op.Hsg.Soc.,Anand Nagar, Dindayal Rd., Near Indrayani Hospital, Dombivali (W), Dist. Thane-421 202

Editor :- Mr. Gopal S. Thorat RNI No. MAHMAR/2014/57230